

डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon) Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रूट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. ०५ डिसेंबर २०२५



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०२२ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





## थोडक्यात...

### राज्य सरकारची 22 हजार कोटींच्या कर्जास हमी

मुंबई (समर्थ गांवकरी) : सुमारे 53 हजार कोटी रुपये खर्चाच्या आणि 126 किलोमीटर लांबीच्या विरार- अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिकेच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला हुडकोकडून घ्याव्या लागणाऱ्या 22 हजार250 कोटी रुपयांच्या कर्जास अखेर राज्य सरकारने हमी दिली आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी कर्ज उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. विरार- अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसाठी आवश्यक भूसंपादनासाठी 22 हजार 250 कोटींची गरज आहे. मौजे नवघर (जि.पालघर) ते मौजे बलावली (ता.पेण) असे 96 किलोमीटरचे पहिल्या टप्प्यातील काम बांधा, वापरा व हस्तांतरित करा(बीओटी) या तत्त्वावर करण्यात येणार आहे. भूसंपादनासाठी आवश्यक निधीची उभारणी करण्यासाठी हुडकोकडून कर्ज घेण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या कर्जासाठी हुडकोने घातलेल्या अटींना मान्यता देण्यास राज्य सरकारने सुरुवातीस नकार दिला होता. तर दुसरीकडे हुडकोही अडून बसल्याने कर्जउभारणी रखडली होती. अखेर हुडकोच्या अटी शर्थीनुसार हे या कर्ज उभारणीस शासन हमी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे विरार ते अलिबाग मार्गाच्या भूसंपादनाचा प्रश्न सुटून, या मार्गाचे काम लवकरच सुरु होईल, असे उच्चस्तरीय अधिकाऱ्याने सांगितले.

### पिंपरीत कुष्ठरोग शोध अभियानात 11 जणांचे निदान

पिंपरी (समर्थ गांवकरी) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने राबविलेल्या कुष्ठरोग शोध अभियानाअंतर्गत 79 हजार 177 घरांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. तीन लाख 61 हजार 854 नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यात 11 रुग्णांना कुष्ठरोग असल्याचे निदान झाले. संशयित रुग्णांना तत्काळ प्राथमिक औषधोपचार देण्यात आल्याचे वैद्यकीय विभागाने सांगितले.

# प्रारूप मतदार याद्यामध्ये गोंधळ कायम?

## ८० हजार मतदारांची नावे दुबार, राजकीय पक्षाचा आक्षेप

**वसई : (समर्थ गांवकरी)**

राज्यभर सध्या दुबार मतदारांचा मुद्दा चांगलाच गाजत आहे. वसई विरार शहरातही आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार याद्यामध्ये गोंधळ असल्याचा आरोप राजकीय पक्षांकडून करण्यात येत आहे. यादीत सुमारे ८० हजार मतदारांची नावे दुबार असल्याचा आक्षेप बविआने घेतला आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. पाच वर्षांनंतर पालिकेची निवडणूक पार पडणार आहे.महापालिका क्षेत्रात २९ प्रभाग येतात. २८ प्रभागांमध्ये प्रत्येकी ४ नगरसेवक यावेळी निवडून द्यावयाचे आहेत. तर २९ व्या प्रभागातून तीन नगरसेवक निवडले जाणार आहेत. अशा एकूण ११५ जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीची आरक्षण सोडत प्रक्रिया ११ नोव्हेंबरला पूर्ण केली होती. त्यानंतर प्रभागातील प्रभाग निहाय मतदार याद्या पालिकेने गुरुवार २० नोव्हेंबरला आपल्या प्रसिद्ध केल्या आहेत. या प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार यादीत ११ लाख २७ हजार ६४० इतक्या मतदारांचा समावेश आहे. या सर्व प्रभागांसाठी १ जुलै २०२५ पर्यंतची विधानसभा मतदार यादी गृहीत धरण्यात आली आहे. मागील काही महिन्यांपासून दुबार मतदार यांचा मुद्दा चांगलाच गाजत आहे. वसई विरार महापालिकेने जाहीर केलेल्या मतदार याद्यामध्ये विविध प्रभागात ५२ हजार ३७८ मतदारांची नावे ही दुबार असल्याचे समोर आले होते. त्यानंतर राजकीय पक्षांनी देखील प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्यांची पडताळणी सुरू केली असून मतदार याद्यांबाबत विविध तक्रारी महापालिकेत दाखल होऊ लागल्या आहेत. तर बहुजन विकास आघाडीने प्रारूप मतदार याद्यांची पडताळणी केली असता तब्बल ८० हजार दुबार आढळल्याचे त्यांनीही आक्षेप नोंदवला आहे. त्यामुळे महापालिकेने जाहीर केलेल्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये गोंधळ असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.




### दुबार मतदारांची पडताळणी सुरू

दुबार मतदार यांचा शोध घेण्यासाठी पालिकेची पडताळणी प्रक्रिया सुरू केली आहे. त्यासाठी पथके नियुक्त केली आहेत. ज्यांचे नाव दुबार यादीत आहे अशा मतदाराची भेट घेऊन हमीपत्र लिहून घेतले जाणार आहे असे महापालिकेच्या निवडणूक विभागाकडून सांगण्यात येत आहे.


### १३ हजार हरकती

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या आगामी निवडणुकीसाठी असलेल्या प्रारुप मतदार याद्यांबाबत हरकती आणि सूचना नोंदवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने ३ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्या अनुषंगाने वसई विरार महापालिकेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्यांवर आता हरकती आणि सूचना नोंदविण्यास सुरुवात केली होती त्यानुसार १३ हजार,३२५ हरकती आणि सूचना प्राप्त झाल्या असल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली आहे.

## नितेश राणेंनी तपोवनातील वृक्षतोडीत कुर्बानीच्या बकऱ्यांना आणलं

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिकमध्ये 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला मोठ्या प्रमाणावर वेग आला असून, साधू-महंतांच्या निवासासाठी तपोवन परिसरातील 1150 एकरांवर साधूग्राम उभारण्याची योजना आहे. या कामासाठी 1800 झाडांची तोड प्रस्तावित असल्याने स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि अनेक सेलिब्रिटींच्या तीव्र नाराजीचा उद्रेक झाला आहे. दरम्यान, तपोवनमधील वृक्षतोड प्रकरणावर भाजप नेते व मंत्री नितेश राणे यांनी वादग्रस्त विधान केल्याने विषय आणखी चिघळला आहे. तपोवनमधील वृक्षतोडीची चिंता करणारे पर्यावरणवादी कधीच ईदच्या वेळी बकरी कापण्याला विरोध करताना दिसत नाहीत, असे नितेश राणे यांनी म्हटले आहे. यावरून शिवसेना ठाकरे गटाने नितेश राणे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय.



शिवसेना ठाकरे गटाचे राज्य संघटक अखिल चित्रे यांनी 'एक्स' वर पोस्ट करत म्हटले आहे की, वृक्षतोड हा पर्यावरणाचा विषय आहे, धर्माचा नाही. टिल्लू-स्तराची बुद्धी असलेल्याला वृक्षतोडसारखा गंभीर विषय कुठून समजणार? टिल्लू-लेव्हल बुद्धीत वृक्षतोड बसणार तरी कुठे? त्याच्या सिस्टीममध्ये तर हिंदू-मुस्लीम, बकरा-कोंबडीच फिरतात, वृक्षतोडची फाईल तर 'अनसपोर्टेड फॉर्मेट' म्हणूनच उघडत नाही, असे म्हणत त्यांनी नितेश राणेंवर टीका केलीय.

नितेश राणे यांनी 'एक्स' वर पोस्ट करत म्हटले होते की, तपोवनमधील वृक्षतोडीची चिंता करणारे पर्यावरणवादी कधीच ईदच्या वेळी बकरी कापण्याला विरोध करताना दिसत नाहीत. तेव्हा गप्प का? सर्व धर्म सम भाव? असे वादग्रस्त वक्तव्य त्यांनी केले आहे. तपोवनमधील वृक्षतोडीचा मुद्दा तापलेला असतानाच नितेश राणे यांच्या वक्तव्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

दरम्यान, नितेश राणेंच्या ट्विटवरून टीकेची झोड उठताच त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत स्पष्टीकरण दिलंय. नितेश राणे म्हणाले की, ईदमध्ये मोठ्या प्रमाणात बकरींची हत्या होते आणि रक्ताचे पाट वाहत असतात, तेव्हा हे पर्यावरणवादी आवाज उठवताना दिसत नाहीत. व्हर्च्युअल बकरी ईद करा, असं कधीच बोलताना दिसत नाहीत. मग एका धर्माला एक न्याय आणि दुसऱ्या धर्माला दुसरा कशाला, असा प्रश्न मी विचारला आहे. झाडं जगली पाहिजेत, हा पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य मुद्दा आहे. पण जसं झाडाला मिठी मारतात, तसं बकरीला का मिठी मारत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केलाय.

## भारत-दक्षिण आफ्रिका तिसरा निर्णायक वनडे सामना कधी खेळवला जाणार?

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांची वनडे मालिका अधिक रोमांचक झाली आहे. भारतीय संघाने मालिकेतील पहिला वनडे सामना १७ धावांनी जिंकला तर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या वनडे सामन्यात भारताला ४ विकेट्सने पराभूत केलं. यामुळे सध्या वनडे मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. त्यामुळे मालिकेतील तिसरा आणि अखेरचा वनडे सामना जिंकणारा संघ मालिका आपल्या नावे करेल. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसरा वनडे सामना कधी, कुठे केव्हा खेळवला जाणार, जाणून घेऊया. भारताचं सर्वात मोठं टेन्शन म्हणजे नाणेफेक जिंकणं असेल. टीम इंडियाने वनडे क्रिकेटमध्ये सलग २० टॉस एकामागून एक गमावले आहेत. दुसऱ्या सामन्यात नाणेफेक



जिंकणं महत्त्वाचं होतं, कारण भारतात हिवाळा असल्याने संध्याकाळच्या वेळेस दव पडतं आणि त्यामुळे फलंदाजी करणं अधिक सोपं जातं. दक्षिण आफ्रिकेने यामुळेच दोन्ही सामन्यांमध्ये नाणेफेक जिंकताच प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. रांचीमधील पहिल्या सामन्यात भारताने सुरूवातीच्या विकेट्स घेतल्याने सामना जिंकता आला. पण रायपूरमधील दुसऱ्या वनडेत दवांनी मोठी भूमिका बजावली आणि द. आफ्रिकेचा याचा फायदा घेत चांगली कामगिरी करत ऐतिहासिक विजय मिळवला.

## उच्च न्यायालयाच्या मतमोजणी निकालाला 'सर्वोच्च' आव्हान

**अकोला: (समर्थ गांवकरी)**

राज्यात नगरपालिका व नगर पंचायतीच्या निवडणुकीची मतदान प्रक्रिया सुरू असतानाच उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाने मतमोजणी लांबणीवर पडली. मतमोजणी प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका आता सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. या प्रकरणी सरन्यायाधीश सूर्य कांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठापुढे उद्या, ५ डिसेंबरला सुनावणी होणार आहे. या याचिकेच्या सुनावणीसह सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहील. राज्यातील सर्व २८८ नगरपालिका व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २ डिसेंबरला दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर रोजी मतदान संपल्याच्या पुढील अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे.

राज्यातील २६४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान झाले. या ठिकाणी ३ डिसेंबरला मतमोजणी होणार होती. मात्र, सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपालिका व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी २१ डिसेंबर रोजी मतमोजणी करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

## १२ वर्षांपासून रिलेशनशिप, दोन वर्षाचा संसार

- भांडणानंतर त्यानं दुसरीकडे लग्नाचा घाट घातला, व्हिडिओ बनवून तृतीयपंथीयने गळ्याला लावला दोर, सोलापुरात नेमकं काय घडलं?

**सोलापूर : (समर्थ गांवकरी)**

सोलापुरातून काल (गुरूवारी, ता २) एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. सोलापुरातील बाळे परिसरातील तृतीयपंथीय प्रकाश उर्फ व्यंकप्पा कोळी (वय २२) यांनी टोकाचं पाऊल उचलत आत्महत्या केली, आत्महत्या करण्यापूर्वी व्हिडीओ बनवून आपल्या जवळच्यांना पाठवला, या व्हिडीओमध्ये आपला प्रियकर सुजित याने तरुणाने दीड वर्षांपूर्वी लग्न केले. घरदार, बहीण, गुरू यांना सोडून स्वतंत्र संसार थाटला, आता तो दुसऱ्या मुलीसोबत लग्न करण्यासाठी सोडल्याची आपली व्यथा मांडली. या प्रेमाच्या त्रिकोणात काल (गुरुवारी) प्रियकराच्या हळदीच्या दिवशी आत्महत्या केली. या आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल प्रियकर सुजित अप्पासाहेब जमादार (रा. वैद्यवाडी, प्रियंका चौक) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार,



प्रकाशने सकाळी नऊच्या सुमारास बाळे परिसरातील साईनगर परिसरातील भाड्याच्या घरात पत्र्याच्या अँगलला ओढणी बांधून गळफास घेतला, नातेवाइकांनी त्याला बेशुद्धावस्थेत छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल केलं. मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्याला मृत घोषित केले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली. या घटनेची माहिती कळताच सोलापूरमधील तृतीयपंथी समूहातील अनेकजण रुग्णालयाबाहेर मोठ्या संख्येने एकवटले. सुजितला जबाबदार धरणारा व्हिडीओ प्रकाशने मृत्यूपूर्वी तयार केल्याची माहिती नातेवाईकांनी पोलिसांना दिली. हा व्हिडीओ कधी काढला आहे, याचा शोध पोलिस घेत आहेत. शिवाय त्याचा मोबाइलही पोलिसांनी जप्त केला आहे.

प्रकाश आणि सुजित हे पूर्वी वैद्यवाडी, प्रियंका चौक या भागात राहत होते. त्याच सुमारास दोघांची ओळख झाली. त्यातूनच दोघांचे प्रेम जमले आयुष्यभर तुझ्यासोबतच राहीन, लग्न करणार नाही, अशी शपथ सुजितने घेतल्याचे प्रकाशचा भाऊ नागेश याने म्हटले आहे. मात्र, पैसे, सोनं घेतलं आणि फसवलं, आणि आता त्याने दुसरं लग्न करत असल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे. तर मृतांच्या भावाने नागेश याच्या मते, तृतीयपंथी प्रकाश आणि सुजित यांचे दिड ते दोन वर्षांपूर्वी लग्न झाले. त्याने त्याचा व्हिडीओ तयार करून नातेवाइकांकडे पाठवला होता.

लग्नानंतर ते दोघे सोबत राहू लागले. दोघांमध्ये भांडणे होऊ लागल्याने प्रकाशने पाच महिन्यांपूर्वी बाळे येथे स्वतंत्र खोली केली. सुजित हा त्या खोलीवर नियमितपणे येत असे.मी हे पाऊल उचलत आहे, याचा जबाबदार फक्त सुजित हा आहे. माझ्याशी लग्न केलं, खोटं प्रेम केलं. आठ वर्ष सोबत राहिला. माझ्याशी लग्न करून घर करून येथे ठेवलं. मला माझ्या जोगती समाजापासून लांब ठेवलं अन् आता तो दुसरं लग्न करतोय. या सगळ्यास जबाबदार फक्त तोच आहे.

## शाळेतील धर्मांतराच्या प्रकाराची सखोल चौकशी करा

### आमदार संग्राम जगताप यांच्यासह शिष्टमंडळाची पोलिसांकडे मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील एका खासगी शिक्षण संस्थेतील महिला शिक्षिकेकडून विद्यार्थ्यांना धर्मांतराचे धडे दिले जात असून तिचे आंतरराष्ट्रीय कॉल उघडकीस आले आहेत. या महिलेविरुद्ध फिर्याद दाखल झाली आहे. येत्या पाच दिवसांमध्ये तिला अटक न केल्यास मोर्चा काढण्याचा इशारा आमदार संग्राम जगताप व संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निवेदन दिले. संबंधित शिक्षण संस्था चालकांनी अशा प्रवृत्तीच्या महिला शिक्षकांना शाळेमध्ये ठेवू नये, लहान मुलांच्या मनावर धर्मांतराबाबत शिकवले जाणे गंभीर असून पालकांनी पुढे येऊन अशा लोकांविरुद्ध पोलिसांकडे तक्रारी दाखल कराव्यात, त्यांना धडा शिकवण्याचे काम आपण करू, पोलीस अधीक्षकांनी लक्ष घालावे, असे आमदार संग्राम जगताप म्हणाले. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, दत्ता खैरे, विशाल पवार, डॉ. राहुल मुथा, अनंत शेळके, रमेश गांधी, अमोल देडगावकर, मेहुल शहा, परेश लोढा, दिनेश चोपडा,



ओंकार घोलप आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले की, शहरातील एका खासगी शाळेत ९ वीत शिकणाऱ्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीला, शाळेतील महिला शिक्षिकेने विश्वासात घेऊन तिला जादूटोण्यासारखा प्रकार करून 'लव जिहाद' मध्ये अडकवण्याचा केलेला प्रकार समोर आलेला आहे. मुलगी आई-वडिलांची एकुलती एक आहे. या शिक्षिकेने मुलीच्या सर्व कुटुंबीयांची सखोल माहिती काढून घेतली. संबंधित शिक्षिका या मुलीला धर्माचे शिक्षण देत होती. विशिष्ट धर्माच्या प्रार्थना म्हणायला शिकवायला लागली. यानंतर शिक्षिकेने मुलीला समाज माध्यमातून एका मुलाशी ओळख करून दिली आणि मुलीच्या परवानगीशिवाय तिचा मोबाइल क्रमांक त्या मुलाला दिला. या मुलाने इतर २५ अल्पवयीन मुलांशी संबंध जुळवून दिले.

## 'एमपीएससी'च्या सचिवपदी तुकाराम मुंढेच येणार?

- विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद बघता

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग(एमपीएससी) ही घटनात्मक संस्था असून यामध्ये अध्यक्ष आणि सचिव ही महत्त्वाची पदे आहे. आयोगाच्या परीक्षा, निकाल, शिफारसी, न्यायालयीन प्रकरणे, नवीन नियमावली लागू करणे आदी सर्व जबाबदाऱ्या या सचिवांकडे असतात. तसेच सचिव हे कार्यालयीन प्रमुखही असतात. मात्र, राज्य सरकारमधील अधिकारी सचिवपदाची जबाबदारी घ्यायला उत्सुक नसल्याने दोन महिन्यांपासून हे पद रिक्त आहे. यामुळे आता स्पर्धा



परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कुचबुज सुरू झाली आहे. एमपीएससीचा कारभार सुधारायचा असेल तर तुकाराम मुंढे यांचीच सचिव पदावर नियुक्ती करा, अशी मागणी पुढे आली असून याला खूप प्रतिसाद मिळत आहे.तुकाराम मुंढे हे नाव महाराष्ट्रात परिचयाचे नाही अशी व्यक्ती मिळणे फार कठीण आहे. आपल्या शिस्तबद्द स्वभाव आणि कडक शिस्तीमुळे तुकाराम मुंढे नेहमीच चर्चेत असतात. सोबतच स्थानिक प्रशासनासोबत त्यांचे होणारे वाद-मतभेद तसंच वारंवार होणारी बदली यामुळे त्याचं नाव प्रसारमाध्यमांमध्येही नेहमी असते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील (एमपीएससी) अत्यंत महत्त्वाचे असे सचिवपद दोन महिन्यांपासून रिक्त आहे. काही दिवसांपूर्वी या पदावर अवर जिल्हाधिकारी जगन्नाथ वीरकर यांची प्रतिनियुक्ती केली. पण त्यांनी पदभार स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे डॉ. सुवर्णा खरात यांचा कार्यकाळ संपल्यापासून सचिवपद रिक्त असून 'एमपीएससी'चा संपूर्ण कार्यभार वाऱ्यावर आहे. विशेष म्हणजे, कुणीही सनदी अधिकारी 'एमपीएससी'च्या सचिव पदाचा काटेरी मुकुट घालण्यास तयार नसल्याने हे पद रिक्त असल्याची माहिती आहे.

# अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या प्रसादाने संपन्न

**एकदरे : (समर्थ गांवकरी)**



मन हा मोगरा अर्पुनी ईश्वरा,पुनरूपी संसारा येने नाही,मन हे शेवंती देऊ भगवंती, पुनरपी संस्कृती येणे नाही,अकोले तालुक्यातील एकदरे जायनावाडी येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.सात दिवस नामवंत महाराजांचे कीर्तन होत असतात.सातव्या दिवशी सकाळी ९ ते ११ ह.भ.प.हर्षल महाराज भांगरे यांच्या किर्तनाने काल्याची सांगता झाली.त्यानंतर अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याचा प्रसादाचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी लाभ घेतला.त्यानंतर भव्य अशी दिंडी मिरवणूक काढण्यात आली. एकदरे जायनावाडी येथील भजनी मंडळ व महिला खूप मोठ्या प्रमाणात सहभाग घेत असतात.तरुण मंडळाने देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहून "ज्ञानोबा माऊली,माऊली तुकाराम "अश्या गजरात टाळ मृदुंग वाजवत आपला सहभाग घेत दिंडीचा मनमुराद आनंद घेतला.गावातील तरुणांनी अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा अशीच पिढ्यानपिढ्या पुढे चालू ठेवली पाहिजे असे गावातील दिंडी चालक ह.भ.प.पांडुरंग महाराज यांनी सांगितले.त्यानंतर जोहाराचा कार्यक्रम झाला.त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. यावेळी गावातील सर्व महिला वर्ग तरूण मंडळ पंचक्रोशीतील सर्व भजनी मंडळ यांनी उपस्थित राहून दिंडीची शोभा वाढवून सांगता करण्यात आली.



अहिल्यानगर : विक्रीस बंदी असलेला, पक्षी, प्राणी व मानवी जिवीतास इजा करणारा प्लास्टीक नायलॉनचा चायना मांज्याची विक्री करणा-यासाठी घेवुन जाणा-या आरोपीकडुन १,८५,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखेने जप्त केला आहे. ही कारवाई १ डिसेंबर रोजी केडगाव येथे करण्यात आली. याबाबत हकिगत अशी की, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि. १ डीसेंबर रोजी अहिल्यानगर शहरात पेट्रोलिंग फिरुन प्लास्टीक किंवा नायलॉन चायना मांजा विक्री करणारे इसमांची माहिती काढत असतांना पथकास अहिल्यानगर शहरातील जी.एल.पी. टॉवर लिंकरोड केडगांव या ठिकाणी होंडा कंपनीची विना नंबरची ऍक्टीवार एक इसम त्याचे पाठीमागे दोन बॉक्स बांधुन घेवुन जात असतांना दिसला.


## थोडक्यात बातम्या...



### कर्करोग निदान व्हॅन — ठाणे जिल्ह्यात उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे जिल्ह्यात नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी राबविण्यात येत असलेल्या कर्करोग निदान उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, जिल्ह्यात फिरत असलेली कर्करोग डायग्नोस्टिक व्हॅन अल्पावधीत हजारोंपर्यंत नागरिकांपर्यंत पोहोचली आहे. जिल्हाधिकारी ठाणे डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम दिनांक ३ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे कर्करोगाचे लवकर निदान करून नागरिकांना तात्काळ उपचाराखाली आणणे, मार्गदर्शन करणे, तसेच कर्करोगाविषयी जागरूकता वाढविणे. कर्करोगाचे वेळेत निदान झाल्यास उपचार अधिक परिणामकारक होतात, या कारणामुळे हा उपक्रम जिल्ह्यासाठी अत्यंत महत्वाचा ठरला आहे.

### गुरुदत्त मंदिराच्या तपपूर्ती निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



पारनेर (स. गांवकरी) : निघोज परिसरातील लाळगे मळा येथील दत्तनगर परिसरात बांधलेल्या गुरुदत्त मंदिराच्या तपपूर्ती निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून गुरुवार दि.४ डिसेंबर पासून बाळकृष्ण महाराज डांगे, रविंद्र महाराज पिंपळगावकर, विनोदाचार्य महेश महाराज मडके पाटील, कांचनताई शिवानंद शेळके, विकास महाराज देवडे आदिंचे किर्तने होणार असून सोमवार दि.८ रोजी सकाळी नऊ ते अकरा यावेळी काल्याचे किर्तन विकास महाराज देवडे यांचे होणार आहे. प्रत्येक दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हॉटेल लक्ष्मीचे मालक मोहनशेठ श्रीमंदीलकर, बबनराव लाळगे, दादाभाऊ लाळगे, बबन कवाद, दत्तात्रय लाळगे, कुशाभाऊ लाळगे, काशिनाथ लाळगे, देवराम लाळगे, संकेत लाळगे , गुरुदत्त सेवा प्रतिष्ठान दत्तनगर आदिंचे किर्तने सौजन्य आहेत. मळगंगा भजनी मंडळ बोदगेवाडी, भैरवनाथ भजनी मंडळ वडगाव गुंड, श्रीराम भजनी मंडळ निघोज, गुरुदत्त भजनी मंडळ वडनेर बुद्रुक आदी जागर करणार आहेत. मधुकर महाराज शिंदे, आकाश महाराज घोलप, साहेबराव महाराज चिकणे गायनाचार्य म्हणून काम पाहणार आहेत. मृदुंगमणी म्हणून श्रीहरी महाराज पवार, तुषार महाराज लाळगे आहेत. गेली बारा वर्षांपूर्वी लाळगे वस्तीपरिसरात दत्त मंदिर बांधले असून त्यानंतर या परिसराला दत्त नगर म्हणून संबोधले जात असून प्रत्येक वर्षी दत्त जयंती दिवशी या अखंड हरिनाम सप्ताहाची मोठ्या उत्साहात सुरुवात होऊन दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. संजीवणी सिमेंट प्रॉडक्ट अ‍ॅन्ड कंट्रक्शन पेव्हर अ‍ॅन्ड पाईप्स या कंपनीचे मालक इंजिनिअर सागर अरुण लाळगे, सागर असोसिएटस या कायदेशीर सल्लागार कंपनीचे अ‍ॅड. गणेश अरुण लाळगे यांनी या अखंड हरिनाम सप्ताहाच्या प्रसिद्धीसाठी सहकार्य केले असून लोकसहभागातून होणाऱ्या या अखंड हरिनाम सप्ताहाचा तसेच गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी होणाऱ्या गुरुदेव दत्त महाराज जयंती उत्सवाचा भावीकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन गुरुदत्त देवस्थान ट्रस्ट, मुंबईकर मंडळ व निघोज ग्रामस्थ, लाळगे ग्रामस्थ, दत्तनगर परिसरातील जनतेने केले आहे.

### बीटस्तरीय स्पर्धा मढ येथे उत्साहात संपन्न



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : सितेवाडी, मढ व पिंपळगाव जोगा येथे यशवंतराव कला क्रीडा महोत्सव २०२५ -२६ अंतर्गत या तीन केंद्रांचा समावेश असून एकूण ३६ शाळांनी सहभाग घेतला. यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळेरान शाळेने लहान गट लेझीम मुले- प्रथम , लहान गट लेझीम मुली- द्वितीय, स्वरा गोविंद कोकाटे इ.२ री बडबडगीत- द्वितीय अशी नेत्रदिपक कामगिरी केली. सध्या शाळा, शिक्षक आणि पालक यांसमोर आव्हान असलेला मुलांचा मोबाईलचा वापर या अत्यंत ज्वलंत विषयावर विद्यार्थ्यांनी लेझीमच्या माध्यमातून सादरी करण केले. मुलांचा धोक्याच्या पातळीवर असलेला स्क्रीन टाइम, मोबाईल मुळे डोळ्यांच्या दृष्टीवर होणारा नकारात्मक परिणाम,स्क्रीन ॲडिक्शन मल्टीपल डिसऑर्डर चं कारण,स्मार्टफोनमुळे लहान मुलांना येणारे डिप्रेशन इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा अंतर्भाव करण्यात आला मोबाईलचा अतिवापर अभ्यासाला हानि कारक असून गेम्स,रील्स यांत वेळ घालवू नका,मोबाईल हे साधन आहे,चुकीचा वापर करून उदयाचे स्वप्न विसरू नका असे संदेश बालचमूंनी दिले. निता चव्हाण,सविता डुंबरे या शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.बाळासाहेब भालेकर केंद्रप्रमुख सितेवाडी यांनी शाळेच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनंदन केले. गोविंद साबळे सरपंच तळेरान, मोहन लांडे अध्यक्ष ग्रामविकास प्रतिष्ठान तळेरान,राजेंद्र गारे सचिव गोविंद कोकाटे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती,प्रविण कोकाटे,रघुनाथ कोकाटे,राजश्री कोकाटे,सचिन कोकाटे,पोपट कोकाटे,पोपट घुटे,शिवाजी हिले, बुधाजी शिंगाडे,पंडित मेमाणे, यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शाळेला तालुकास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# अतुल भाऊ माने यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

■ पारनेर तालुक्यात जल्लोष

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पारनेर तालुका भाजपाचे उपाध्यक्ष अतुल भाऊ माने यांची राष्ट्रीय मोदी सेवा समितीच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली . या समिती त माने यांच्या या निवडीमुळे पारनेर तालुक्या ला प्रथमच संधी प्राप्त झाली आहे . त्यांच्या निवडीचे पारनेर तालुक्यात जल्लोष साजरा करण्यात आला आहे .

अतुल भाऊ माने यांचे पुणे , पिंपरी चिंचवड व पारनेर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे कार्य पाहता त्यांची राष्ट्रीय मोदी सेवा समितीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली . राष्ट्रीय अध्यक्ष विकास यदुवंशी व प्रदेशाध्यक्ष किशोर मनोहर लखन , महाराष्ट्र राज्य युवा मोर्चाचे अध्यक्ष किशोर पवार यांनी माने यांच्या वर जिल्हा उपाध्यक्ष पदाची धुरा सोपवली .

या निवडी प्रसंगी बोलताना युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष किशोर पवार यांनी सांगितले की , अतुल मानें सारखे कार्यकर्ते पक्षाचे व संघटनेचे काम प्रामाणिकपणे आहोरात्र करत असतात व अशा कार्यकर्त्यांना संधी ही मिळालीच पाहिजे , समितीच्या माध्यमातून केंद्र सरकार व राज्य सरकारच्या लोकहिताच्या योजना समाजातील प्रत्येक घटकातील व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे काम राष्ट्रीय मोदी सेवा समितीचे प्रत्येक कार्यकर्ते करत आहेत व अहिल्यानगर जिल्ह्याची मोठी जबाबदारी आम्ही अतुल भाऊ माने यांना देत आहोत व ती जबाबदारी ते प्रामाणिकपणे पार पाडतील , अशी आम्हाला खात्री आहे , म्हणूनच आम्ही अळकुटी सारख्या ग्रामीण भागातील निष्ठावंत कार्यकर्त्यावर जबाबदारी सोपवली आहे , असे प्रदेशाध्यक्ष पवार यांनी गौरवोद्गार काढले आहेत .

या निवडी प्रसंगी बोलताना नूतन जिल्हा उपाध्यक्ष अतुल भाऊ माने यांनी राष्ट्रीय अध्यक्ष विकास यदुवंशी , प्रदेशाध्यक्ष किशोर लखन व युवा मोर्चाचे अध्यक्ष किशोर पवार यांचे आभार मानले व दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडेल.

येणाऱ्या काळात सामाजिक कार्य व सरकारच्या योजनांचा प्रसार , प्रचार व संघटन वाढीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत राहीन , असे माने म्हणाले .

भाजपाचे निष्ठावंत व स्पष्टवक्ते कार्यकर्ते म्हणून अतुल भाऊ प्रसिद्ध आहेत , त्यांना प्रदेशाध्यक्ष किशोर लखन , अहिल्यानगर शहराध्यक्ष विनोद काशीद यांनी अहिल्यानगर येथे नियुक्तीपत्र सुपूर्द केले. यावेळी युवा मोर्चाचे कान्हुर व जवळा मंडलाचे अध्यक्ष संग्राम पावडे , भाजपा चे मंडलाचे सरचिटणीस तुकाराम भाऊ येवले , सदस्य भागचंद पवार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निवडीचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील , माजी खा . सुजय विखे पाटील , विश्वनाथ कोरडे , सचिन वराळ व इतरांनी स्वागत केले आहे .

अकोलेतील नामांकित आरोग्य अधिकारी डॉ. मारुती भांडकोळी यांच्या मातोश्री

# सुंदराबाई भांडकोळी यांचे वृद्धापकाळाने निधन!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



अकोले शहरातील नामांकित आरोग्य अधिकारी डॉ. मारुती भांडकोळी यांच्या मातोश्री तसेच डॉ. ज्योती भांडकोळी यांच्या सासूबाई सुंदराबाई कावजी भांडकोळी (वय 80) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर घोटी–शेळवंडी येथे 3 डिसेंबर रोजी दुपारी ठीक 4 वाजता घोटी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सुंदराबाई भांडकोळी या अत्यंत खडतर परिस्थितीतून आपल्या कुटुंबाला उभारी देणाऱ्या, संघर्षमय आयुष्य जगलेल्या मातृशक्ती होत्या. आर्थिक अडचणी आणि ग्रामीण, अतिदुर्गम भागातील शिक्षणाच्या मर्यादा असूनही त्यांनी मुलांना उच्च शिक्षण दिले. परिस्थिती गरीब असली तरी जिद्द, चिकाटी आणि स्वप्नांवरचा विश्वास यांच्या जोरावर त्यांनी आपल्या मुलांच्या आयुष्याला दिशा दिली. त्यांच्या कष्टाचं, संस्कारांचं फलित म्हणजेच तालुक्यातील पहिले एम.बी.बी.एस. डॉक्टर झालेले डॉ. मारुती भांडकोळी यांचे आरोग्य सेवेतले मोठे योगदान. डॉ. मारुती भांडकोळी आणि डॉ. ज्योती भांडकोळी यांनी गावकऱ्यांच्या उपचारासाठी, सामाजिक बांधिलकी जपत, 'पैसा नव्हे तर सेवा' या भावनेने कार्य केले. शेकडो रुग्णांना जीवनदान देणारे हे दोन्ही रत्न त्यांच्या मायमाऊलीच्या संस्कारांचेच वरदान होत. या मायमाऊलीने जगाचा अखेरचा निरोप घेतल्याने केवळ पंचक्रोशी नव्हे तर संपूर्ण अकोले तालुक्यात शोककळा पसरली आहे. आरोग्य व सामाजिक क्षेत्रातील ही मोठी हानी असल्याचे व्यक्त करण्यात येत आहे.

# महाळुंगीमध्ये युवा शेतकऱ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील महाळुंगी ग्रामपंचायत व क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य (के ए ग्रुप अकोले) यांच्या संयुक्त विद्यमाने महाळुंगी येथे अकोले तालुक्यातील विविध भागातून आलेल्या युवा शेतकऱ्यांसाठी भव्य एकदिवसीय कृषी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाळुंगी ग्रामस्थांनी स्थापन केलेल्या समृद्ध आदिवासी ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनीने उभारलेल्या विविध कृषी प्रकल्पांचा प्रत्यक्ष अनुभव या कार्यशाळेत युवकांना देण्यात आला. गावात उभारलेला पूर्णपणे सौरऊर्जेवर चालणारा राईस मिल प्रकल्प, तसेच ७-८ अत्याधुनिक शेडनेट प्रकल्प, कृषीसाठी तयार करण्यात आलेली ५-६ मोठी शेततळी, आणि त्या तळ्यांवर चालणारी पूर्ण सौरऊर्जेवर आधारित पंप प्रणाली या सर्व सुविधांच्या माध्यमातून महाळुंगी गावाने एक अभिनव व स्वयंपूर्ण कृषी मॉडेल निर्माण केले आहे. या मॉडेलला आज सर्वत्र "महाळुंगी मॉडेल" म्हणून ओळखले जाते.

■ 'महाळुंगी मॉडेल' ठरले प्रेरणादायी

कार्यशाळेत समृद्ध आदिवासी ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी चे फाउंडर युवराज डामसे यांनी राईस मिलपासून शेडनेट, पॉलिहाऊस तंत्रज्ञान, सौरऊर्जेचा वापर, शाश्वत शेती, शेतकरी उत्पादक कंपनीच्या स्थापनेपासून तिचे व्यवस्थापन, रोजगारनिर्मितीचे मार्ग, तसेच उपलब्ध विविध शासकीय अनुदान व योजना याबाबत सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला महाळुंगी गावचे सरपंच मदन मेंगाळ, ग्रामविकास अधिकारी वैभव डगळे तसेच के ए ग्रुप अकोले अध्यक्ष अरुण गोंदके यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाच्या यशात के ए ग्रुप अकोले चे पदाधिकारी विशाल भाऊ गोंदके, वैभव गोंदके, प्रकाश खाडे, रोहिदास मुठे, तुषार साबळे, समीर गोंदके, अशोक भालचिम, किसन गोंदके, पवन खाडे, समीर देशमुख, विजय असवले, सुरेश सदगीर यांचे विशेष योगदान राहिले.

# विकासाचं श्रेय मतदार संघातील सर्वसामान्य जनतेलाच

## आमदार काशिनाथ दाते : दैठणे गुंजाळ येथे ८० लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ "पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात होत असलेला विकास हा कोणत्याही एकाच व्यक्तीचा नव्हे, तर या मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाचा आणि सहकार्याचा परिपाक आहे. लोकशाही व्यवस्थेत नागरिकच लोकप्रतिनिधींना विकासाची संधी देतात. त्यामुळे आज होणाऱ्या प्रत्येक विकासकामाचे श्रेय हे माझ्या मतदार संघातील जनतेलाच आहे," अशा शब्दांत आमदार काशिनाथ दाते यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

दैठणे गुंजाळ येथे आमदार दाते यांच्या शुभहस्ते श्री खंडेश्वर देवस्थान भक्त निवास बांधणे - १० लक्ष, श्री खंडेश्वर ते हिवरे बाजार रस्त्याला जोडणारा पाहोच रस्ता करणे - ५ लक्ष, रोहीदास नगर रस्ता काँक्रीटीकरण करणे - ७ लक्ष, ग्रामपंचायत कार्यालय विस्तारीकरण करणे - १० लक्ष, नामदेव गुंजाळ घर ते जि.प.प्रा. शाळा बंगला रस्ता काँक्रीटीकरण करणे - ४० लक्ष, रेणुका माता मंदीर रस्ता काँक्रीटीकरण करणे - ८ लक्ष रुपये अशा एकूण ८० लाख रुपयांच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजनाचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला. रस्ते, पाणी व मूलभूत सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशाने हाती घेतलेल्या या कामांमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कार्यक्रमास दैठणे गुंजाळ गावचे आजी-माजी पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकासकामांच्या शुभारंभानंतर उपस्थित नागरिकांनी आमदार दाते यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरल्याचे मत व्यक्त करत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

पुढे उपस्थितांना उद्देशून बोलताना आमदार दाते यांनी सांगितले की, "पारनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. प्रत्येक काम नियोजनपूर्वक व वेळेत पूर्ण करण्यासाठी संघटितपणे प्रयत्न सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून जशी मला जनसेवा करण्याची संधी मला दिली तशीच एक संधी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या माध्यमातून महायुतीच्या समविचारी उमेदवारांना द्यावी, जेणेकरुन विकासाचा वेग वाढण्यास मदत होईल.

कट : दैठणे गुंजाळ गावासह संपूर्ण ढवळपुरी गटात आमदार दातेसर व जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या माध्यमातून विकासकामांचा मोठा डोंगर उभा राहिला असून या भागातील जनतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याला ते सातत्याने प्राधान्य देत असतात, या गटातील जनतेच्या वतीने मी या दोनही नेतृत्वाचे आभार व्यक्त करतो.

**- सुभाष दुधाडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस**

# बोगस मतदान, पैशांचा वापर आणि निवडणूक निकालांवरील वाढता अविश्वास

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



राज्यात काल पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुका पुन्हा एकदा भारतीय लोकशाही प्रक्रियेतील गंभीर त्रुटी आणि नैतिक अधःपतन समोर घेऊन आल्या आहेत. मतदान केंद्रांवर 'बोगस मतदारां'चा सुळसुळाट, सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा हस्तक्षेप, आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयांवरून निर्माण झालेला राजकीय अविश्वास यामुळे लोकशाहीचा मूळ गाभा धोक्यात आला आहे. जर ही प्रवृत्ती अशीच वाढत राहिली, तर मतदारांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडून निवडणुकीचा अर्थच संपुष्टात येईल. बोगस मतदारांचे थैमान आणि सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप

आज (दिनांक ०२ डिसेंबर) रोजी अनेक ठिकाणी, विशेषतः बीड, जळगाव, अमरावती जिल्ह्यासह विविध भागांत, बोगस मतदार मोठ्या संख्येने आढळून आले. हे लोक बनावट ओळखपत्रांवर किंवा दुसऱ्यांच्या नावाने मतदान करण्याचा प्रयत्न करताना दिसले. या बोगस मतदारांना पकडल्यानंतर त्यांना सुरक्षितपणे केंद्रातून बाहेर काढण्यासाठी सत्ताधारी पक्षाचे नेते, आमदार खासदारांचे नातेवाईक व कार्यकर्त्यांनी प्रयत्न केल्याचे चित्र बऱ्याच ठिकाणी दिसून आले. अशा घटनांमुळे निवडणुकीत सत्ताधारी पक्ष थेट गैरव्यवहार करत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

बीड आणि इतर संवेदनशील केंद्रांवर राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये झालेले हाणामारीचे प्रसंग हे निवडणुकीतील वाढत्या हिंसक प्रवृत्तीचे आणि सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याच्या मानसिकतेचे द्योतक आहेत. हे प्रकार निवडणुकीची पवित्रता नष्ट करणारे असून, सत्तेचा गैरवापर करून 'निकाल' मॅनेज करण्याचे प्रयत्न स्पष्टपणे दर्शवतात. सध्याच्या निवडणुकीत मतदारांना प्रभावित करण्यासाठी पैशाचा आणि प्रलोभनांचा वापर सर्रास होताना दिसतो आहे. अनेक ठिकाणी मतदारांना पैसे देऊन, किंवा विविध वस्तू व आमिषे दाखवून मतदान करण्यास भाग पाडले जात आहे. यामुळे उमेदवार निवडणुकीत जाहीर होण्यापूर्वीच मतांचा 'बाजार' भरलेला दिसतो.

जेव्हा मत पैशांनी विकले जाते, तेव्हा निवडून आलेला प्रतिनिधी लोकांप्रति नाही, तर निवडणुकीत गुंतवलेल्या पैशांप्रति जबाबदार राहतो. परिणामी, निवडून आलेले लोकप्रतिनिधी जनहिताऐवजी स्वहित साधतात. ही प्रवृत्ती लोकशाही तत्त्वांच्या अगदी विरोधात आहे.

नागपूर खंडपीठाने आज झालेल्या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्याचे निर्देश दिले. या विलंबामुळे विरोधी पक्षांनी सत्ताधारी पक्षावर थेट टीका केली आहे. विरोधी पक्षांचा आरोप: "ईव्हीएम (EVM) मशीनमध्ये घोळ करून, निकालाची आकडेवारी सत्ताधारी भाजप स्वतःच्या बाजूने लावेल." निवडणूक प्रक्रियेवर किंवा आयोगाच्या निर्णयांवर अशाप्रकारे उघडपणे अविश्वास व्यक्त होणे, हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. मतदारांच्या मनात निकालाच्या वैधतेबद्दल संशय निर्माण झाल्यास, ते संपूर्ण निवडणूक प्रक्रियेकडे संशयाच्या नजरेने पाहू लागतात. न्यायालयाचा निर्णय जरी कायदेशीर असला, तरी राजकीय पक्षांकडून त्याचा वापर एकमेकांवर टीका करण्यासाठी होत आहे, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता आणखी कमी होत आहे. बोगस मतदान, पैशांचा वापर, राजकीय राडा आणि निवडणूक प्रक्रियेवरचा वाढता अविश्वास हे सर्व प्रकार भारतीय लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहेत. जर निवडणुकीत केवळ पैशाचा आणि सत्तेच्या बळावरच विजय मिळवता येत असेल, तर: सामान्य नागरिकांचा 'माझ्या एका मताने फरक पडतो' या भावनेवरील विश्वास उडून जाईल. प्रामाणिक आणि निःपक्षपाती उमेदवारांना संधी मिळणार नाही, आणि निवडणुकीला कोणताही अर्थ राहणार नाही.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# यादीतील दुबार नावे तातडीने छाननी करून त्रुटीपूर्तता करा



**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

दिवा शहर - कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील मतदार यादी काही दिवसांपूर्वी प्रारूप मतदार याद्या स्वरूपात प्रसिद्ध झाल्या आहेत. या यादींच्या तपासणीदरम्यान तब्बल १७,००० पेक्षा जास्त दुबार नावाची मतदारांची नावे वगळण्यात असल्याचे आढळून आले असून, त्याचप्रमाणे त्या निवडणूक आयोगामार्फत काही ठिकाणी दुबार नावे २ स्टार चिन्ह देऊन दर्शविण्यात आले आहे. या सर्व मतदारांना मतदानाचा अधिकार निर्भेळ व अडथळाविरहितपणे मिळावा, तसेच त्यांच्या नावांबाबतची शहानिशा तात्काळ व्हावी यासाठी महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२ डिसेंबर २०२५ रोजी भारतीय जनता पार्टीचे ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले, भाजपा दिवा शहर मंडळ अध्यक्ष सचिन रमेश भोईर, उपाध्यक्ष भाजपा ठाणे शहर विजय अनंत भोईर, कार्यकारिणी सदस्य रोशन भगत आदी मान्यवरांनी प्रतिनिधी मंडळाच्या वतीने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. सौरव राव यांची भेट घेतली. प्रतिनिधी मंडळाने आयुक्तांकडे संबंधित मतदारांच्या नावांची शहानिशा करून, अंतिम मतदार यादीत त्यांना मतदानाचा अधिकार प्राप्त होईल यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यासाठी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ जिल्हाधिकारी ठाणे व श्री. सौरव राव आयुक्त ठाणे महानगर पालिका ह्यांना निवेदन दिले. त्यामध्ये क्षेत्रानुसार पद्धतशीर पडताळणी करण्यात यावी, अनियमित नोंदी वगळणे व क्षेत्रानुसार अहवाल तयार करून दुबार नावे वगळण्यात यावी आणि क्षेत्रानुसारच मतदारांची तातडीने छाननी करून त्रुटीपूर्तता करण्याची मागणी केली आहे.



कळवण – आगामी नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाचा संवाद मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात भाजप प्रवक्त्या व माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती ताई पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...




### नऊ दिवसाचे आजारी बछडे सापडले; आजारी बछडे वनविभागाच्या ताब्यात

संगमनेर खुर्द (स. गांवकरी) : संगमनेर तालुक्यातील निमगाव खुर्द येथे निमगाव खुर्द सांगवी रस्त्यालगत असलेल्या प्रविण गोपाळे यांच्या वस्ती नजिक घासच्या शेतालगत थंडीने कुड कुडत असलेले आजारी बिबट्याचे बछडे (अंदाजे नऊ दिवसाचे ) दिसून आले, असता गोपाळे यांनी सदर माहिती वनविभागला कळवण्यात आली.तात्काळ वनविभागाचे वनपाल माने, वनरक्षक बेनके, वनसेवक शरद कानवडे हे घटनास्थळी दाखल होऊन नऊ दिवसाच्या आजारी बछडे ताब्यात घेऊन निमगाव खुर्द येथील वनविभागाच्या पर्यटन विभागात पाठवण्यात आले.

### बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या वतीने लोनाड येथे आरोग्य शिबिर संपन्न



भिवंडी (स. गांवकरी) : नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या वतीने भिवंडी तालुक्यातील लोनाड येथे आरोग्य तपासणी शिबिर व नेत्र तपासणी शिबिर घेऊन बाबा ग्रुप फाऊंडेशनने सामाजिक बांधिलकी जपली आहे. यावेळी एपेक्स हॉस्पिटल्स मुलुंड आणि आय हॉस्पिटल यांचे शिबिरासाठी सहकार्य लाभले असून, आरोग्य शिबिरात एक्स-रे, चष्मे, मेडिसिन , बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या तर्फे मोफत देण्यात आले असून अनेक नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी बाबा ग्रुप फाऊंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव,खजिनदार हरेश जाधव , सदस्य विकास धनगर, अजय जाधव, ड्रायव्हर संघटना अध्यक्ष जावेद आली,प्रवेश खलिफा,ऋतिक जाधव, प्रकाश गायकवाड, विशाल तांबे, आदित्य जाधव, रोहित जाधव यांनी मेहनत घेतली.

### १२ जानेवारी रोजी रंगणार चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

- स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा सप्ताहाचा उपक्रम

अहिल्यानगर (स. गांवकरी) : स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती व राष्ट्रीय युवा सप्ताहानिमित्त १२ जानेवारी रोजी चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, धार्मिक, साहित्य, वैद्यकिय व पर्यावरण संवर्धनावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व सामाजिक संस्थांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले जाणार असून, पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे व युवा मंडळाचे अध्यक्ष पै.संदिप डोंगरे यांनी केले आहे. दरवर्षी प्रमाणे संस्थेच्या वतीने स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा सप्ताह विविध उपक्रमांनी निमगाव वाघा (ता. जि. नगर) येथे उत्साहात साजरा केला जाणार आहे. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध क्षेत्रात निस्वार्थ भावनेने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद ज्ञान गौरव पुरस्कार, समाज गौरव, क्रीडा रत्न व युवा गौरव, राष्ट्रमाता जिजाऊ नारी शक्ती पुरस्कार तसेच साहित्य क्षेत्रात काव्य प्रतिभा पुरस्कार प्रदान केले जाणार आहे. या पुरस्कारांसाठी २० डिसेंबर पर्यंत प्रस्ताव पाठवायचे आहे. प्रस्ताव पाठविण्यासाठी संस्थेचे कार्यालय स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था (अध्यक्ष, पै.नाना डोफलगरे), निमगाव वाघा ता. जि. अहिल्यानगर 414005 या पत्त्यावर पाठवावे व अधिक माहितीसाठी 9226735346; 8605775261 या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

### जिल्ह्यात नगरपरिषद निवडणुकीत सरासरी ५१ टक्के मतदान

नाशिक (स. गांवकरी) : जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी मंगळवारी ( दि.०२) मतदान प्रक्रिया किरकोळ अपवाद वगळता शांततेत पार पडली. जिल्ह्यात सरासरी ५१ टक्क्यांच्या जवळपास मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा नगरसेवक पदासाठी १०२८ तर नगराध्यक्षपदासाठी ६१ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहेत. जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, सिन्नर, भगूर, ओझर, पिंपळगाव बसवंत, चांदवड, सटाणा, मनमाड, नांदगाव आणि येवला या ११ नगरपरिषदांची मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. सकाळच्या सत्रात उमेदवारांसह अबालवृद्धांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे अनेक मतदान केंद्रांवर काहीशी गर्दी पाहायला मिळाली. मतदानानंतर २६६ नगरसेवक आणि ११ नगराध्यक्ष पदांसाठीच्या उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले असून मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार आहे. जिल्ह्यात एकूण सरासरी मतदान 51 टक्क्यांच्या आसपास राहिल्याचा अंदाज आहे. येवला, सिन्नर आणि नांदगाव येथे उशिरापर्यंत मतदारांच्या रांगा सुरू होत्या. दुपारी तीननंतर मोठ्या संख्येने मतदार घराबाहेर पडल्याने प्रतीक्षायाद्या वाढल्या.

# दिव्यांगांसाठी स्वतंत्र विद्यापीठाची आवश्यकता : दिगंबर घाडगे पाटील

- विधान परिषदेत दिव्यांग आमदार नेमावा– बाळासाहेब सोनवणे
- जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा




**नाशिक :** (समर्थ गांवकरी)

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त नाशिकरोड येथे आयोजित कार्यक्रमात दिव्यांगांच्या शैक्षणिक व प्रतिनिधित्वाच्या हक्कांवर भर देण्यात आला. २१ दिव्यांग प्रकारांच्या विस्तारित परिभाषेनुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष अभ्यासक्रम, संशोधन, प्रशिक्षित शिक्षक आणि सहाय्यक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी तसेच दिव्यांग शिक्षणाला बळ मिळण्यासाठी राज्यात स्वतंत्र दिव्यांग विद्यापीठ स्थापन करण्यात यावे असे महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष दिगंबर घाडगे पाटील यांनी प्रतिपादन केले. नाशिक रोड येथील संघटनेच्या कार्यालयात तीन डिसेंबर जागतिक अपंग दिनाच्या कार्यक्रमानिमित्त अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्य उपाध्यक्ष तथा विभागीय अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे,कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन सतीश लाड, जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप महाले आदि उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. पुढे बोलताना घाडगे पाटील म्हणाले की, अनुसूचित जाती जमाती तसेच पंचायतराज समितीच्या आधारे दिव्यांग स्वतंत्र विधिमंडळ समितीची गरज आहे. त्यामुळे दिव्यांगांच्या समस्या थेट शासनपातळीवर मांडल्या जातील व त्वरित निर्णय शक्य होतील. शिक्षण, नोकरी, पेन्शन, आरक्षण यासंदर्भातील योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होईल. जिल्हानिहाय दिव्यांगांची खरी गरज ओळखून सहाय्यक तंत्रज्ञान व निधी योग्य व्यक्तींपर्यंत पोहोचेल. बोगस प्रमाणपत्रांवर नियंत्रण येईल आणि दिव्यांगांचे अधिकार व न्याय अधिक प्रभावीपणे संरक्षित होतील. अशी अशी दिव्यांग विधिमंडळ समितीची आवश्यकता आहे. यावेळी विभागीय अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांनी आपले मनोगत विधान परिषदेत राज्यपालांमार्फत दिव्यांग आमदार नियुक्त करण्याची आवश्यकता मांडत, दिव्यांगांच्या समस्या प्रत्यक्ष अनुभवलेल्या व्यक्तीच त्यांचे प्रश्न प्रभावीपणे विधिमंडळात मांडू शकतात, असे सांगितले. दिव्यांग विद्यापीठ आणि दिव्यांग आमदार या दोन्ही मागण्या दिव्यांग समाजाच्या सक्षम भविष्याचा पाया ठरतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी दिव्यांग पतसंस्थेचे चेअरमन सतीश लाड म्हणाले की, दिव्यांगांसाठी आरक्षित चार टक्के अनुशेषाची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे आणि त्याचबरोबर बोगस दिव्यांग व्यक्ती व त्यांच्या प्रमाणपत्रांची कडक पडताळणी आवश्यक आहे. अशाने खऱ्या दिव्यांगांना न्याय व त्यांचे हक्क प्रत्यक्षात मिळतील, तसेच योजनांचा योग्य लाभ पात्र व्यक्तींनाच पोहोचेल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी जनार्दन पगारे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख हरी ठाकरे, मंगला विसपुते आदींनी मनोगत व्यक्त करत दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग कर्मचारी अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

# राज्यांतर्गत रब्बी हंगाम पीक स्पर्धा २०२५-२६ जाहीर

- ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी व शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागामार्फत 'रब्बी हंगाम सन-२०२५-२६' साठी राज्यांतर्गत पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे. शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या स्पर्धेत रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या ५ पिकांचा समावेश करण्यात आला आहे. पिकांच्या उत्पादन वाढीसाठी विविध प्रयोग करणाऱ्या आणि भरघोस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. स्पर्धेचा निकाल तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन स्तरांवर जाहीर केला जाईल.

# सामुदायिक श्री गुरुचरित्र पारायणास महिलांचा उस्फूर्त प्रतिसाद

- सावेडीतील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र चॅरिटेबल ट्रस्ट श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताह




**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

श्री दत्तजयंतीनिमित्त सावेडीतील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र चॅरिटेबल ट्रस्ट श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताहात सामुदायिक श्री गुरुचरित्र पारायणास महिलांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या सप्ताह काळात ग्रामदेवता सन्मान, मंडल मांडणी,मंडल स्थापना, अग्निस्थापना, स्थापित देवता हवन नित्य स्वाहाकार, गणेश याग/ मनोबोध याग,नित्य स्वाहाकार, स्वामी याग,नित्य स्वाहाकार, गीताई याग नित्य स्वाहाकार, चंडी याग,नित्य स्वाहाकार, रुद्र याग/ मल्हारी याग झाले आहेत. या सर्व कार्यक्रमास महिलांचा उस्फूर्त प्रतिसाद आहे. दररोज धार्मिक कार्यक्रमात सुनिता सोनवणे, संध्या सोनवणे (नंनद भावजया) या ५ बाय ७ या चौकोनात स्वामी समर्थ, गणेश, गीताई, नाशिकची वणी देवी ची रांगोळी काढली होती तसेच मल्हार, सांगतीदिवशी श्री दत्ताची रांगोळी काढणार आहे उदया नित्य स्वाहाकार, बलि पूर्णाहुती, दुपारी १२:३९ वा. श्रीदत्त जन्मोत्सव होणार असून ५ डिसेंबरला श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताह सांगता होणार आहे. या दिवशी दुपारी महाप्रसादाने सांगता होईल कार्यक्रम यशस्वितेसाठी महिला व पुरूष सेवेकरी आपली सेवा देत आहेत.

# चोरीच्या बॅटऱ्या विकताना आरोपी जाळ्यामध्ये; ४ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

## कोतवाली पोलिसांची कारवाई

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

कोतवाली पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने गाझीनगर, काटवन खंडोबा परिसरात मोठी कारवाई करत, चोरीच्या मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्यांची विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका तरुणाला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून तब्बल ४ लाख ८० हजार रुपये किमतीच्या १२ बॅटऱ्या जप्त करण्यात आल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार, दि. १ डिसेंबर २०२५ रोजी कोतवाली पोलीस स्टेशनचे निरीक्षक संभाजी गायकवाड यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गाझीनगर परिसरात एक इसम त्याच्याकडील बॅटऱ्या विकण्याचा प्रयत्न करत आहे. या माहितीच्या आधारे, पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तत्काळ त्या ठिकाणी धाव घेतली. पंचांना सोबत घेऊन केलेल्या तपासणीत, जिशान जमीर मलीक (वय-२३, रा. गाझीनगर) नावाचा तरुण लोकांना बॅटऱ्या विकण्याबाबत विचारणा करत असताना आढळून आला. पोलिसांनी त्याला बॅटऱ्यांच्या मालकी हक्काबाबत विचारणा केली असता, त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली आणि कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत. यानंतर पोलिसांनी पंचासमक्ष आरोपीचे घर तपासले. या झडतीदरम्यान LINEAGE POWER कंपनीच्या मोबाईल टॉवरमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रत्येकी ४०,००० रुपये किमतीच्या एकूण १२ बॅटऱ्या मिळून आल्या, ज्यांची अंदाजित जुनी वापर किंमत ४,८०,००० रुपये आहे. सदर बॅटऱ्या चोरीच्या मालमत्तेतून आलेल्या असाव्यात असा पोलिसांचा संशय आहे. पोलिसांनी जिशान मलिक याला मुद्देमालासह ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२४ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे बॅटरी चोरी करून त्यांची विक्री करणाऱ्यांच्या टोळीला मोठा दणका बसल्याचे बोलले जात आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# २ ते ४ डिसेंबर दरम्यान थंडीच्या लाटेची शक्यता

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

सद्यस्थितीत कडाक्याची थंडी पडत असून जिल्ह्याचे किमान तापमान १० सेल्सिअस पेक्षा कमी झाल्याचे हवामान खात्याच्या नोंदीनुसार दिसून आलेले आहे.

दि. २ ते ४ डिसेंबर २०२५ दरम्यान जिल्ह्यात काही ठिकाणी तीव्र थंडीच्या लाटेची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून जिल्ह्यासाठी "येलो अलर्ट" प्रसारीत करण्यात आला आहे. नागरिकांनी थंडीपासून बचावासाठी दक्षता घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे. थंडीपासून बचावासाठी नागरिकांनी खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी : थंडीच्या लाटेबाबत स्थानिक हवामानाच्या अंदाजाची रेडिओ, टी.व्ही. व वर्तमानपत्रामध्ये प्रसारीत होणाऱ्या बातम्यांद्वारे माहिती मिळवावी.

# नाशिक येथे दुसऱ्या पिढीतील प्रगत 'लीडलेस पेसमेकर – AVIER'चे प्रत्यारोपण



**नाशिक :** (समर्थ गांवकरी)

नाशिकच्या वरिष्ठ इंटरव्हेन्शनल कार्डियोलॉजिस्ट डॉ. सीमा अजय नक्षणे (गवळी) यांनी दुसऱ्या पिढीतील अत्याधुनिक लीडलेस पेसमेकर 'AVIER' यशस्वीरित्या प्रत्यारोपित केला. ही शस्त्रक्रिया अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल नाशिक येथे करण्यात आली. हे उत्तर महाराष्ट्रातील पहिले प्रत्यारोपण ठरले असून हृदयरोग उपचारात नाशिक शहरासाठी ही ऐतिहासिक पायरी ठरली आहे.

रुग्ण एक वृद्ध पुरुष असून त्याला नुकताच हृदयविकाराचा झटका आल्यामुळे फक्त पंधरा दिवसांपूर्वी अँजिओप्लास्टी करण्यात आली होती. त्यामुळे तो सध्या दोन रक्त पातळ करणाऱ्या औषधांवर (ड्युअल अँटिप्लेटलेट थेरपी) होता. अशातच त्यांचे हृदयाचे ठोके खूप कमी झाल्यामुळे त्यांना परमनंट पेसमेकर बसविण्याची आवश्यकता निर्माण झाली.अशा परिस्थितीत पारंपरिक पेसमेकर बसविताना छातीत पॉकेट तयार करून वायर घालावी लागते, ज्यामुळे गंभीर रक्तस्रावाचा व संसर्गाचा धोका निर्माण होतो. रक्तपातळची औषधे थांबविणेही अशक्य असल्याने पारंपरिक पद्धतीने पेसमेकर बसविणे अत्यंत जोखमीचे ठरले असते.

या गुंतागुंतीच्या परिस्थितीत डॉ. सीमा नक्षणे (गवळी) यांनी लीडलेस तंत्रज्ञानाचा पर्याय निवडला. AVIER लीडलेस पेसमेकर हे सुक्ष्म, वायरविरहित, आणि संपूर्णपणे हृदयाच्या आत बसविले जाणारे उपकरण आहे. ते पायातील शिरेमार्गे कॅथेटरच्या सहाय्याने हृदयात बसविले जाते, त्यामुळे छातीवर कुठलाही चिर नाही किंवा बाह्य तारांची गरज नसते. त्यामुळे शस्त्रक्रियेनंतर रक्तस्राव, संसर्ग आणि इतर गुंतागुंतींचा धोका जवळपास शून्य होतो. रुग्णाने अतिशय चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला असून अल्पावधीतच तो बरा होऊन घरी परतला.

लीडलेस पेसमेकर हे हृदयाच्या ठोक्यांचे नियंत्रण करण्यासाठीचे अत्याधुनिक आणि सुरक्षित तंत्रज्ञान आहे. विशेषतः वृद्ध रुग्ण, रक्त पातळ करणारी औषधे घेणारे किंवा संसर्गाचा धोका असलेले रुग्ण यांच्यासाठी ही उपचारपद्धती अत्यंत उपयुक्त आहे.

या प्रासंगी डॉ.कांचन भांबरे, डॉ.गिरीश बच्छाव, श्री अनुप त्रिपाठी आणि श्री शिवकुमार रोहाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले

डॉ. सीमा अजय नक्षणे (गवळी) म्हणाल्या, "लीडलेस पेसमेकर हे हृदयरुग्णांसाठी एक क्रांतिकारी पर्याय ठरत आहेत. पारंपरिक पेसमेकरच्या तुलनेत ही प्रक्रिया अधिक सुरक्षित, वेदनारहित आणि लवकर पुनर्वसन करणारी आहे. नाशिक आणि उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांना आता जागतिक दर्जाचे हृदय उपचार नाशिक मधील नामवंत अशोका मेडिकल हॉस्पिटल मध्ये उपलब्ध आहे

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून सतरंजी व घड्याळ भेट !

■ एन.के.टी. ग्रुप ठाणे यांच्या सहकार्याने हरिपाठ पेन व इतर साहित्य वितरण!

**अकोले :** (समर्थ गांवकरी)



जागतिक दिव्यांग दिनानिमित्त समाजातील दिव्यांग मुला–मुलींबद्दल असलेल्या आत्मीयतेतून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आदिवासी एकता निवासी मूकबधिर विद्यालयास भेट देत विविध उपयुक्त साहित्यांचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून डॉ. आरोटे यांनी विद्यालयास एक मोठी सतरंजी, दोन भिंतीवरील मोठी घड्याळे तसेच इतर आवश्यक साहित्य भेट दिले.

यासोबतच शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या संकल्पनेतून व एन.के. टी. ग्रुप ठाणे यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना हरिपाठ, पेन व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर उमटली. या उपक्रमाबद्दल विद्यालयातील शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. कार्यक्रमास दैनिक समर्थ गांवकरी चे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, करंडी गावाचे माजी सरपंच चंद्रकांत गोंदके उपस्थित होते. शिक्षकवर्गात खताळ मॅडम, राठोड सर, डाळींबकर सर, तोरकडी सर तर शिक्षकेतर सहकाऱ्यांमध्ये ज्ञानेश्वर लोकरे व सीमा रेवगडे उपस्थित होते.

डॉ. विश्वासराव आरोटे आणि एन. के. टी. ग्रुप ठाणे यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला असून दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा आहे.



ठाणे, दिवा : दिवा शहरातील साबेगावात राहणारा सुशांत आगरे याने पॉवरलिफ्टिंगमध्ये भारतासाठी सुवर्ण पदकाची कमाई केली आहे. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुका मधील रावारी गावाचा सुपुत्र आणि भारतीय पॉवरलिफ्टिंग संघाचा कर्णधार कुमार सुशांत सोनू आगरे याने खडतर परिस्थितीवर मात करत अतुलनीय मेहनतीच्या जोरावर जगाला आपली ताकद दाखवली आणि भारतासाठी सुवर्ण पदक मिळवून देण्याचे मोलाचे काम केले आहे.

# ठाण्यात विविध विकासकामांचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते लोकार्पण

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)



ठाणेकरांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांच्या पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण करण्याच्या उद्देशाने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ओवळा -माजिवडा मतदार संघाचे आमदार व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण संपन्न झाले.


यावेळी ठाणे महापालिकेचे अधिकारी व भागातील संदिप डोंगरे, रवि घरत, भगवान देवकाते, हेमंत खांडेकर यांच्या सह माजी नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या भरघोस निधीतून ठाणे शहरातील विविध भागात जलतरण तलाव, समाज भवन , स्मशानभूमीचे लोकार्पण करण्यात आले. सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन सर्वांचा एकत्रित विकास साधण्यासाठी ८०% समाजकारण व २०% राजकारण या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर आधारित कार्य करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काम करण्याऐवजी वर्षातील ३६५ दिवस सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध असणारे आम्ही कार्यकर्ते आहोत.

आनंद नगर, ठाणे येथे नव्याने उभारण्यात आलेल्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या नावे २ जलतरण तलावांचे लोकार्पण मोठ्या उत्साहात पार पडले.

तर फुटबॉल खेळाच्या प्रशिक्षणासाठी फुटबॉल टर्फ बरोबरच नायलॉन नेट, लँडस्केपिंग, चेंजिंग रूम, शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच आकर्षक प्रवेशद्वार ची निर्मिती करण्यात आली आहे तर अनेक स्मशानभूमींचे नूतनीकरण करताना सीएनजी / एलपीजी गॅस दाहिनी मशीन बसविण्यात आली आहे.

## थोडक्यात बातम्या...




### शाओमी इंडियातर्फे रेडमी १५ सी ५ जी लॉन्चची घोषणा

पुणे (स. गांवकरी) : शाओमी इंडियाने रेडमी 15C 5G हा नवा स्मार्टफोन सादर केला आहे. १७.५३ सेंमीचा एचडी+ डिस्प्ले, स्लीक 3D क्वाड-कर्व्ड डिझाईन आणि ५० मेगापिक्सेल एआय ड्युअल कॅमेरा या मॉडेलची मुख्य वैशिष्ट्ये ठरतात. हा फोन मूनलाइट ब्लू, डस्क पर्पल आणि मिडनाइट ब्लॅक या रंगांमध्ये उपलब्ध असून मूनलाइट ब्लूला विशेष दुहेरी रंगाची मॅग्नेटिक इंक प्रोसेस दिली आहे. मीडियाटेक डायमेन्सिटी 6300 ऑक्टा-कोर प्रोसेसरवर चालणारा हा स्मार्टफोन स्मूद परफॉर्मन्स देतो. मेमरी एक्स्टेन्शनसह १६GB पर्यंत RAM आणि १TB पर्यंत स्टोरेज मिळू शकते. तो HyperOS 2 वर चालतो आणि Google Gemini, Circle to Search, कॉल सिंक आणि शेअर्ड क्लिपबोर्डसारखी स्मार्ट फीचर्स देतो. ६000mAh बॅटरीमुळे दीर्घकाळ वापर शक्य होतो, तर ३३W टर्बो चार्जिंगमुळे फोन फक्त २८ मिनिटांत ५० टक्के चार्ज होतो. २३ तास व्हिडिओ आणि १०६ तास संगीत प्लेबॅकचा दावा कंपनीने केला आहे. फोनला IP64 रेटिंगही मिळाले आहे आणि २०० टक्के व्हॉल्यूम बूस्टसह तो गोंगाटातही स्पष्ट आवाज देतो. या फोनच्या 4GB+128GB व्हेरिएंटची किंमत १२,४९९ रुपये, 6GB+128GB ची किंमत १३,९९९ रुपये आणि 8GB+128GB व्हेरिएंटची किंमत १५,४९९ रुपये ठेवण्यात आली आहे.

### कंधार नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाची माळ कोणाच्या गळ्यात

■ राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, काँग्रेस, खरा किंगमेकर कोण ठरणार

कंधार (स. गांवकरी) : कंधार नगरपालिकेच्या निवडणुकीत मतदारांनी आपलं मतदान करून नगराध्यक्ष व नगरसेवकांचे भविष्य बंद पेटीमध्ये असल्याने नगराध्यक्ष व नगरसेवकांची धाक दुखी वाढली नगराध्यक्ष कोण्या पक्षाचा कोण होणार नगराध्यक्ष अंदाज मात्र कुणालाही कळेना मतदारांनी मतदान करून बंद पेटीत उमेदवारांना दिला आहे .कंधार नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये एकाही पक्षाला बहुमत मिळणार नाही व नगराध्यक्ष पदही कुण्या पक्षाला मिळेल व कोण्या पक्षाचे नगरसेवक निवडून येतील हे मात्र राजकीय नेत्यांना सुद्धा कळत नसल्याने सर्व नगरसेवकांची नगराध्यक्ष यांची डोकेदुखी वाढली आहे .निवडणुकी राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रिंगणामध्ये असल्याने पक्षाच्या राजकीय नेत्यांना सुद्धा एक्झिट पोल निघत नाही नेमकं कुण्या पक्षाचा नगराध्यक्ष होईल हे मात्र एक्झिट पोल मध्ये सुद्धा दिसत नाही सर्वसामान्य नागरिकांकडून नगरसेवक राष्ट्रवादी पक्षाचे १२,व १३ काँग्रेस पक्षाचे ६ व , ७ व अपक्ष, १ असा अंदाज काही राजकीय व काही सामाजिक कार्यकर्ते एक्झिट पोल काढत आहे पण मात्र नगराध्यक्ष कोण्या पक्षाचे हे मात्र सिद्ध होत नाही त्यासाठी एकच चर्चा सुरू आहे. निकाल आल्यानंतर कळेल नेमकं नगराध्यक्ष कोण अशी चर्चा सर्वसामान्य मध्ये होत आहे. मतदारांनी मतदान करून नगरसेवक पदाचे एक्झिट पोल यांची चर्चा होते नगराध्यक्ष पदाची पण चर्चा अशी होते भाजपच्या नगराध्यक्ष उमेदवारांनी ४००० वर किंवा आसपास मतदान घेतले तर राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार स्वप्निल पाटील लुंगारे विजय होतील नाहीतर भाजप पक्षाच्या उमेदवारांनी १५०० किंवा १००० काँग्रेस पक्षाचे उमेदवार शहाजी अण्णा नळगे विजय होतील नाहीतर काही भागात भाजपचे नगराध्यक्ष पदाची उमेदवार टक्कर देतील असाही काय भागामध्ये अंदाजा काढले जात आहे .खरा अंदाजा राजकीय नेत्यांनाही कळेना नेमकं नगराध्यक्ष होणार पण कुण्या पक्षाचा सर्व नगरसेवकांना व भावी नगराध्यक्ष ची डोकेदुखी वाढली आहे.

### फोर्स मोटर्सची २०२५ मध्ये ५९% वाढ

FORCE MOTORS

पुणे (स. गांवकरी) : फोर्स मोटर्सने नोव्हेंबर २०२५ मध्ये देशांतर्गत विक्रीत मोठी 59% वार्षिक वाढ नोंदवली. अर्बनिया आणि ट्रॅक्स प्लॅटफॉर्मच्या वाढत्या मागणीमुळे ही वाढ साध्य झाली. ग्रामीण व अर्ध-शहरी बाजारपेठांमध्ये जीएसटी सुधारणांमुळे ट्रॅक्स मॉडेल अधिक किफायतशीर ठरल्याने रिप्लेसमेंट मागणीतही वेग आला. ट्रॅव्हलर आणि मोनोबस या कंपनीच्या पीपल-मोबिलिटी मॉडेल्सनीही सातत्यपूर्ण वाढ दाखवली. एप्रिल ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत कंपनीची एकूण विक्री गेल्या वर्षाच्या तुलनेत 23% ने वाढली. निर्यात मात्र शिपमेंट सायकलमधील बदलांमुळे कमी झाली, तरीही एकूण विक्रीत 53% वाढ नोंदवण्यात आली.या कामगिरीवर भाष्य करताना व्यवस्थापकीय संचालक प्रसन फिरोदिया यांनी सांगितले की, ग्राहकांचा मजबूत विश्वास, उत्तम कार्यक्षमता आणि कमी मालकी खर्च देणाऱ्या नवीन पिढीच्या वाहनांना मिळणारा प्रतिसाद कंपनीच्या वाढीचा आधार बनत आहे. पायाभूत सुविधा आणि ग्रामीण-शहरी गतिशीलता वाढत असताना फोर्स मोटर्स देशभरात नावीन्य आणि विश्वसनीयतेवर भर देत आहे.

# राजगुरुनगरला भक्तीभावाने दत्तजयंती साजरी

**राजगुरुनगर:** (समर्थ गांवकरी)



राजगुरुनगर येथील एसटी आगारात एसटी अवधूत मंडळाच्या वतीने दत्तजयंती उत्सव भक्तीभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम साजरे झाले. सकाळी दत्तात्रेय मूर्तीस लघुरुद्र अभिषेक करून महापूजा करण्यात आली. दुपारी एसटी अवधूत मंडळाचे संगित भजन, महाआरतीचा कार्यक्रम झाला. संध्याकाळी रंगनाथ महाराज नाईकडे (कडधे) यांचे दत्तजन्मावर प्रवचन झाले त्यानंतर प्रसाद वाटप करण्यात आले. राजगुरुनगर व परिसरातील असंख्य दत्तभक्तांनी या सोहळ्याचा आणि दत्तगुरु दर्शनाचा लाभ घेतला. चिंतामण गोसावी, संतोष एरंडे, कालीदास चिखले, अनिल गोसावी, दिलीप कहाणे, पांडुरंग शिंदे, किरण मोरे, सोमनाथ आढळ, शशिकांत दळवी, दिगंबर पोटे, नंदकुमार पवार, राजेश कांबळे, गोरक्ष कोळेकर आदींनी उत्सवाचे नियोजन केले.

# एमआयटी एडीटी विद्यापीठ- फिलिप्स इंडिया यांच्यात सामंजस्य करार

**पुणे :** (समर्थ गांवकरी)



नावीन्य, संशोधन आणि भावी काळासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी एडीटी) विद्यापीठ, पुणे आणि फिलिप्स इंडिया यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला. उद्योग–विद्यापीठ सहकार्य बळकट करण्याच्या दृष्टीने हा करार एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या करारांतर्गत एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात 'प्रोजेक्ट मॅनेजमेंट' हा विषय संरचित पद्धतीने समाविष्ट करण्यात येणार असून फिलिप्सच्या तज्ज्ञांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योग-अनुभव, तज्ज्ञ व्याख्याने, उद्योगभेटी आणि प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील. या करारावर स्वाक्षऱ्या करण्यासाठी फिलिप्स इंडियाकडून विस्पी काकारीयल, आशिष शाह आणि चेतन लोणकर उपस्थित होते. तर विद्यापीठाकडून कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट प्रा. डॉ. सायली गणकर, प्र.कुलगरु डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ. स्वाती मोरे, डॉ.रेणू व्यास, डॉ.नचिकेत ठाकूर, डॉ.सुदर्शन सानप आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना चेतन लोणकर यांनी विद्यापीठाच्या प्रगतिशील दृष्टीकोनाचे आणि प्रभावी समन्वयाचे कौतुक केले. तसेच उद्योग–विद्यापीठ सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी एमआयटी एडीटी व्यवस्थापनाने दिलेल्या सातत्यपूर्ण पाठबळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या करारामुळे विद्यार्थ्यांसाठी परिवर्तनकारी शैक्षणिक संधी निर्माण होतील, संयुक्त संशोधनाला चालना मिळेल आणि आरोग्य तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भावी विकासात मोलाचे योगदान देता येईल, असे प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी यावेळी सांगितले.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त अकोले येथे विविध उपक्रमांचा उत्साह!

■ आदिवासी एकता निवासी मूकबधिर विद्यालयात क्रीडा स्पर्धा, प्रभात फेरी व विविध कार्यक्रमांचे आयोजन!

**अकोले :** (समर्थ गांवकरी)



जागतिक दिव्यांग दिनानिमित्त (दि. ३ डिसेंबर २०२५) आदिवासी एकता निवासी मूकबधिर विद्यालय, अकोले येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. दिवसभर चाललेल्या कार्यक्रमात शालेय अंतर्गत क्रीडा स्पर्धा, प्रभात फेरी, स्थळ भेट, स्पोर्ट ड्रेस वाटप तसेच खाऊ वाटप असे उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वनविभाग अकोले येथील, वनपाल श्री. जाधव साहेब, वनरक्षक श्री. काकड साहेब, श्रीमती करवर मॅडम, अंबरे मेजर, वनकर्मचारी नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी वनपाल श्री. जाधव साहेब यांनी पर्यावरण संवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि जंगलाच्या सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. पर्यावरण रक्षणामध्ये प्रत्येकाच्या योगदानाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. संस्थेचे सचिव माननीय श्री. डूबे सर यांनीही आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर संदेश दिला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती खताळ मॅडम, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवसाचे सर्व उपक्रम उत्साहात पार पडत विद्यार्थ्यांनीही विविध कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

# एकूण मतदान २३४९१ त्यापैकी मतदान १६०६५ शांततेत पार

**शिवनेरी :** (समर्थ गांवकरी)

जुन्नर नगरपालिका निवडणूक २०२५ एकूण मतदान २३ ४९१ मंगळवार दि . २ रोजी सायंकाळपर्यंत १६०६५मतदारांनी मतदानाचा हक्क शांततेत पार पाडला . ही निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील व पोलीस निरीक्षक किरण अवचर तसेच होमगार्ड व इतर स्टाफ यांनी अहोरात्र नियंत्रण ठेवले . जुन्नर नगरपालिकानिवडणुकीत पुरुष ११८०१ व महिला ११६९०असे मतदार आहेत .त्यापैकी पुरुष ८३२५ व महिला ७७४० असे एकूण १६०६५मतदारांनी मतदानाचा हक्क बजवीला . जुन्नर नगरपालिका बूथ क्रमांक एक पुरुष ३३८ व महिला ३१४ , बुथ क्रमांक एक पुरुष ३४० व महिला ३७३ , बुथ क्रमांक दोन पुरुष ३५३ व महिला ३३८ , बुथ क्रमांक दोन पुरुष ३८९ व महिला ४१५ , बुथ क्रमांक तीन पुरुष ३४८ व महिला ३११ , बुथ क्रमांक तीन पुरुष३५३ व महिला२९६.

# संविधान दिनानिमित्त डॉ. विखे पाटील कॉलेजमध्ये कार्यशाळा

## संविधान हा भारताचा आत्मा - दादासाहेब काजळे

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)



विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने संविधानाच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त संविधान अमृत महोत्सव विशेष उत्साहात साजरा करण्यात आला. एनएसएस युनिटतर्फे आयोजित या एकदिवसीय संविधान कार्यशाळेची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेच्या सामूहिक वाचनाने झाली. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव आणि संविधानाबद्दल अभिमानाची भावना जागृत करण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून सहसचिव विद्या भारतीचे दादासाहेब काजळे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी मसुदा समितीचे ऐतिहासिक कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दृष्टेपण, संविधानाची निर्मिती प्रक्रिया आणि त्यातील मूलभूत मूल्ये याचे सोप्या शब्दांत सविस्तर स्पष्टीकरण केले. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये भारतीय समाजव्यवस्थेचे आधारस्तंभ असल्याचे त्यांनी सांगितले. डिजिटल युगातील आव्हानांवरही त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत संविधान हा भारताचा आत्मा आहे असे प्रतिपादन केले. संविधान दिनानिमित्त डॉ.विखे पाटील कॉलेजमध्ये कार्यशाळेत प्राचार्य डॉ.आर.आर.नवथर, आबसाहेब गरवारे महाविद्यालयाचे निरिक्षक डॉ.कुंडलिक पारधी मान्यवर व्यक्ती उपस्थित होते. दिवसभरात एनएसएसतर्फे संविधान जनजागृतीसाठी विविध उपक्रम घेतले गेले. महाविद्यालय परिसरात आयोजित जनजागृती रॅलीत स्वयंसेवकांनी थशीहश झशेश्रिश, हक्कांसोबत कर्तव्येही महत्त्वाची यांसारख्या घोषणांद्वारे नागरिकांपर्यंत संविधान मूल्यांचा संदेश पोहोचवला. संविधानातील विविध कलमे, अधिकार आणि कर्तव्यांवर आधारित पोस्टर्स आणि माहितीफलकांचे आकर्षक प्रदर्शनही करण्यात आले, यामध्ये प्रतिक बोरुडे, महेश जगताप, स्नेहा आहिरे, हर्ष पाटील, रोहन नवगिरे, चैतन्य बारी, ऋषिकेश कानडे, अभिनव नायर, चैतन्य नन्नवरे, साक्षी मालुंजकर, पुनम थोरात, क्रांती दुग्गड, संस्कृति दिवटे, शुभम शिरसाठ, नवनाथ रोहकले आदींसह विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेला रस्त्यावरचा नाट्यप्रयोग होता. प्रा. गणेश डहाणे लिखित आणि श्री. राम पठारे दिग्दर्शित या नाट्यात भ्रष्टाचार, सामाजिक समता, कायद्याचे पालन आणि नागरिकांचे कर्तव्य यांसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर प्रभावी भाष्य करण्यात आले. कृष्णकांत त्रिमुखे यांनी सादर केलेली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका विशेष उठून दिसली. विविध विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयाला उपस्थितांनी दाद दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# राजूकाका देशपांडे यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद

■ वसंत कवाद सर

पारनेर : (समर्थ गांवकरी)



निघोज आणी पंचक्रोशीतील गाव व परिसरात दोनशे पेक्षा जास्त विवाह जमवून आणण्यासाठी प्रयत्न करणारे वधू वर सूचक मंडळाचे अध्यक्ष राजूकाका देशपांडे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद सर यांनी व्यक्त केले आहे.देशपांडे यांना सेनापती बापट पुरस्कार मिळाला असून त्यांचा खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते गौरविण्यात आले याबद्दल त्यांचा ट्रस्ट वतीने अध्यक्ष कवाद, कोषाध्यक्ष रामदासशेठ वरखडे, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वासराव शेटे, संघटक मंगेश वराळ पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कवाद बोलत होते. यावेळी विश्वस्त ॲड ज्ञानेश्वर लामखडे, बबनराव ससाणे, अनिल शेटे, ज्ञानेश्वर लंके, शंकरराव लामखडे, रमेश आण्णा ढवळे, अनिल लंके, आशाताई वरखडे, सिमाताई वराळ, व्यवस्थापक महेश ढवळे आदी उपस्थित होते. अध्यक्ष कवाद सर यावेळी म्हणाले पुरस्कार मिळाल्याच्या आनंद प्रित्यर्थ राजूकाका देशपांडे यांनी ट्रस्ट संचालित प्रसादालयालयासाठी देणगी दिली. हा खरा परमार्थीक आनंद साजरा करण्याची एक समाजसेवी सेवाभावी पद्धत आहे. वाढदिवस असो किंवा सुख दुखात सहभागी होऊन ते सामाजिक काम करतात. म्हणून पुरस्कार समीतीचे आयोजक अर्जुन भालेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना सेनापती बापट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ही निघोज गावांसाठी अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.



ठाणे : दिव्यातील तरुणाच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर ठाकरे शिवसेनेच्या शिष्टमंडळाचे दिवा पोलिसांना निवेदन दिले. वाढती गुन्हेगारी व दिवा पोलीस स्टेशन नसल्याने अपुरे पोलीसबळ या दृष्टीने पेट्रोलिंग वाढविण्याच्या मागणीसह इतर मागण्या करण्यात आल्या प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पावले उचलली जातील असे श्री पगार, पोलीस निरीक्षक, श्री अमोल कोळेकर सहायक पोलीस निरीक्षक यांनी स्पष्ट केले आहे. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### खरटवाडी येथील ३ मुलीचा जिल्हा संघात खेळाडू म्हणून निवड

■ राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा साठी जिल्हा संघात निवड

तामसा (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा खो- खो अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत सहभागी झालेल्या शंभरहून अधिक मुलींमधून नांदेड जिल्ह्याच्या १८ वर्षाखालील कुमारी मुलींच्या खो- खो संघामध्ये एकूण १५ मुलींची निवड करण्यात आली असून त्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरटवाडी शाळेच्या तीन विध्यार्थिनी सुरेखा राजू बैंगनवाड ,वैष्णवी श्रीराम पुंजरवाड व ऋतुजा बालाजी बोईनवाड या तीन मुलींची जिल्हा संघात निवड झालेली असून राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.महाराष्ट्र अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा दिनांक ४ डिसेंबर ते ७ डिसेंबर या तारखेस अहिल्यानगर येथे होणार असून महाराष्ट्र राज्यातील सर्वच जिल्ह्यातून येणाऱ्या मुलींच्या संघातून महाराष्ट्र संघाची निवड केल्या जाणार आहे आणि निवडलेला संघ हा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल. यासाठी राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा निवड चाचणी ठेवण्यात आलेली आहे. या स्पर्धेत हदगांव तालुक्यातील खरटवाडी शाळेतील खेळाडू मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होण्यासाठी राज्य अजिंक्य स्पर्धा निवड चाचणीसाठी नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत आहेत त्यामुळे खेळाडू मुलींचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्हा संघात निवड झाल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापक चंद्रकांत कुणके, सरपंच रुख्मिणी श्रीधर पुंजरवाड, ग्रापसदस्य उमेश पुंजरवाड,हणमंत पुंजरवाड,सहशिक्षक श्रीकृष्ण पुंजरवाड, शिवानंद पुंजरवाड, राजु देवडे सह गावकऱ्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि गौरव करण्यात आलं.



### जागतिक दिव्यांग दिन साजरा

नवीन नांदेड (स. गांवकरी) : निवासी अंध कल्याण प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र धनेगाव नांदेड येथे जागतीक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. ३ डिसेंबर रोजी सर्व जगभरात जागतिक दिव्यांग दिन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आमच्या निवासी अंध कल्याण प्रशिक्षण केंद्र धनेगाव नांदेड येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शासनाच्या आदेशानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार शिक्षक पालक मेळावा माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, पालकां सोबत संवाद साधने याप्रसंगी दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार सर्व पालकांना व विद्यार्थ्यांना दिव्यांग व्यक्तीच्या कायद्याबाबत माहिती देण्यात आली. २१ प्रकारच्या दिव्यंगत्वाचे माहिती देऊन त्याचे वाचन करण्यात आले.दिव्यांगांच्या विविध कलागुणांना, त्यांच्या मध्ये लपलेल्या सुप्त अशा विविध गुणांना वाव देणे, त्यांना भविष्यामध्ये येणाऱ्या अडचणी वरती कशा पद्धतीने मार्ग काढणे हे सर्व कार्यशाळेतील शिक्षक वृंदांनी या मेळाव्यामध्ये नमूद केले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.शाळेतील कार्यालय अधीक्षक दिपक कदम,निदेशक बाबुराव शेकडे,शेख फय्याज,गृहपाल दत्तात्रय घोगरे,गोदावरी वाघमारे, शिवानंद माने,त्र्यंबक पाटील, पृथ्वीराज परदेशी ह्या सर्वांची उपस्थिती होती.

### महात्मा गांधी अपंग विद्यालय अपंग दिन साजरा



कंधार (स. गांवकरी) : कंधार तालुक्यातील गांधीनगर येथे दि. ३ डिसेंबर रोजी जागतिक अपंग दिन गांधी अपंग विद्यालय गांधीनगर येथे उत्साहात साजरा करण्यात आला आहे. जागतिक अपंग दिनानिमित्त शाळेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यात क्रिडा स्पर्धा संस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाचे अध्यक्ष अपंग विद्यालाचे मुख्याध्यापक बाजीराव ताटे , तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा, हरी ताटे, प्रा,पदमवार बि,डी , प्रा,होनवडजे , उपस्थिती होती. विद्यालयामध्ये आपण दिन साजरा करताना प्राध्यापक होनवडजे यांनी अपंग दिनाचे महत्व समजून सांगितले आहेत एखादी व्यक्ती हा शरीराने विकलांग/अपंग असू शकतो पण तो मनाने आत्मविश्वासाने तो सदुठ आसतो आसे मत व्यक्त केले आहेत .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक ताटे सर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार कल्याणकर सर यांनी मानले शाळेमध्ये विद्यार्थी व शिक्षक सर्व कर्मचारी उपस्थिती राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली आहे.

# स्वारातीम विद्यापीठामध्ये २७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव

■ ४ ते ८ डिसेंबर दरम्यान मान्यवरांच्या उपस्थितीत होणार

■ राज्यातील २४ विद्यापीठातील ३३०७ खेळाडूंचा सहभाग



नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

राज्यपाल यांच्या कार्यालयामार्फत पुरस्कृत २७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव – २०२५ यावर्षी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ या कालावधीत उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. राज्यातील विविध विद्यापीठांच्या क्रीडापटूंना एकत्र आणणारा हा भव्य सोहळा विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर रंगणार आहे.

या क्रीडा महोत्सवात बॅडमिंटन, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, खो-खो, कब्बडी, बुद्धिबळ आणि ॲथलेटिक्स (रनिंग, उंच उडी, लांब उडी इत्यादी) या आठ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. राज्यातील २४ विद्यापीठातील १७२१ मुले आणि १५८६ मुली असे एकूण ३३०७ खेळाडू सहभागी होणार आहेत. खेळाडूसह मार्गदर्शक आणि व्यवस्थापकांची संख्या ५७६ असणार आहे. तसेच या स्पर्धेकरिता २७६ पंचांची नियुक्ती विद्यापीठातर्फे करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे यावर्षी मा. राज्यपाल महोदयांच्या सुचनेनुसार विद्यापीठाने पहिल्यांदाच 'भारत पोर्टल' नावाने लिंक तयार केलेली आहे. या लिंकद्वारे यावर्षी स्पर्धा भारतभर बघता येणार आहेत. असा प्रयोग करणारे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड' हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ आहे. आणि हा विद्यापीठासाठी एक बहुमान आहे.

क्रीडा महोत्सवाची जय्यत तयारी विद्यापीठ परीसरामध्ये सुरु आहे. याकरिता विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन, तांत्रिक, पात्रता, निवास, वैद्यकीय, अहवाल लेखन, निधी संकलन, खरेदी व वित्त, सांस्कृतिक, क्रीडा ज्योत, बक्षीस वितरण, पाणी वाटप, विद्युत व्यवस्था, प्रोटोकॉल व फ्लॅग, तक्रार निवारण, वाहतूक, भोजन प्रसिद्धी व वृत्तांकन, स्वच्छता, क्रीडा साहित्य वाटप, कार्यालयीन कामकाज आदी २८ समित्या स्थापन करण्यात आलेली आहेत. सर्व समित्यांमध्ये विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यापीठ परिसरातील प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी आदींचा समवेश आहे.

महोत्सवाचे उद्‌घाटन दि. ४ डिसेंबर रोजी दुपारी ४.३० वाजता महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य मा. श्री. अशोकरावजी चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. उद्‌घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहतील. उद्‌घाटन प्रसंगी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. माणिकराव कोकाटे, बहुजन कल्याण, दुग्ध व्यवसाय व अक्षय ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अतुल सावे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. मेघनाताई बोर्डीकर, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप-महानिरीक्षक शहाजी उमाप यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. याशिवाय परभणीचे खासदार संजय जाधव, राज्यसभा सदस्य डॉ. अजित गोपछडे, लंगरसाहेब गुरुद्वारा, नांदेडचे संत बाबा बलविंदरसिंघजी महाराज, राज्यसभा सदस्य फौजीया खान, नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर, नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, नायगावचे आमदार राजेश पवार, मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण, शिवछत्रपती व अर्जुन पुरस्कार विजेती सारिका काळे तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सर्व मान्यवर सदस्य यांच्यासह महोत्सवाचे स्वागताध्यक्ष विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन उपस्थित राहणार आहेत.

# राजगुरुनगर नगरपरिषद निवडणुकीत उत्साहपूर्ण मतदान

■ ६८.९५ टक्के मतदानाची नोंद, मतदारांचे मागण्या पूर्ण करत उमेदवार कडून मतदान केंद्रापर्यंत नेण्याची व्यवस्था

राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)

राजगुरुनगर नगरपरिषद निवडणुकीत रविवारी मतदान प्रक्रिया पूर्णपणे शांततेत पार पडली. दिवसभरात कोणत्याही अनुचित प्रकाराची नोंद झाली नाही, शांतता पूर्ण वातावरणात झालेल्या निवडणुकीसाठी एकूण ६८.९५ टक्के मतदानाची नोंद झाली अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शैलजा पाटील व सहाय्यक निर्णय अधिकारी अंबादास गर्कळ यांनी दिली. आठ वर्षांनंतर नागरिकांना पुन्हा नगरसेवक निवडण्याची संधी मिळाल्याने मतदारांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. सकाळ पासून सुरू झालेल्या मतदान प्रक्रियेत वयोवृद्ध मतदार साठी उमेदवार कडून वाहने ठेवण्यात आली होती,तसेच बाहेरगावी राहणाऱ्या मतदारांनीही मतदानासाठी विशेष येत ओला, उबेर, खाजगी कॅबचा वापर केला. चुरशीच्या लढतीत उमेदवारांनी आपल्या मतदारांचे विविध मागण्या पूर्ण करत त्यांना मतदान केंद्रापर्यंत नेण्याची व्यवस्था केली होती.

# नांदेड तहसीलच्या टीमची अवैध वाळू उत्खनना विरोधात कारवाई

नांदेड : (समर्थ गांवकरी)



नांदेड तहसील कार्यालयाच्या पथकाने पुन्हा एकदा अवैध रित्या वाळू उत्खनन करणाऱ्या विष्णुपुरी,कल्लाळ , भागात गस्तीवर असलेल्या पाच इंजिन जप्त केले असून तीन बोटी व २५ तराफे मजुर कर्मचारी यांच्या सहाय्याने जागेवरच जाळुन नष्ट करण्यात आले असून ४५ लाख रुपये मुद्देमाल जप्त करून लिबंगाव पोलीस स्टेशन येथे लावण्यात आले आहे,या कार्यवाही मुळे परिसरात रेती तस्करांत खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी नांदेड राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ , तहसीलदार संजय वारकड यांच्या निर्देशानुसार नायब तहसीलदार स्वप्रिल दिगलवार, मंडळ अधिकारी कुणाल जगताप ,मोहसीन सय्यद ग्राम महसूल अधिकारी माधव भिसे, बरोडा .संजय खेडकर,महेश जोशी, मनोज जाधव,तलाठी मारोती श्रीरामे, मनोज सरपे, महसूल सेवक बालाजी सोनटक्के,शिवा तेलंगे महसूल पथक परिसरामध्ये ३ डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजता अवैध रेती उत्खनन प्रतिबंधा साठी विष्णुपुरी, कल्लाळ, भागामध्ये गस्तीवर असतानाअवैध रेती उत्खनन करणारे इंजिन व बोटी नदीमधून पळून गेल्या त्याचा पाठलाग करून बोरगाव ,तेलंग परिसरामध्ये गोदावरी नदीमध्ये ३ बोट व ५ इंजिन पकडण्यात आले.

पथकाने मजुरांच्या साह्याने ३ बोटी स्फोट करून नष्ट केले. तसेच २५ तराफे जागेवरच जाळून नष्ट करण्यात आले , ५ इंजिन जप्त करून पोलीस स्टेशन लिंबगाव येथे लावण्यात आले. असे एकूण ४९ लाख किमतीचा मुद्देमाल जाग्यावरच स्फोट करून नष्ट करण्यात आला. २० लाख रुपयेचे इंजिन जप्त करण्यात आले.सदर कारवाई दरम्यान पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली लिंबगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बोधनकर व पोलीस उप निरीक्षक सय्यद पोलीस हे.कॉ. रमण बैनवाड, मोरे,गर्दनमारे व तेलंग व पो.कॉ.देशमुख यांचे पोलीस पथक उपलब्ध करून दिले.

अवैध उत्खननासंदर्भात नांदेड महसूल प्रशासन सक्तीने कारवाई करेल असा इशारा नांदेडचे उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ व तहसीलदार संजय वारकड यांनी दिला आहे.

# किनवट नगर परिषद मतदान शांततेत पार

■ महाविकास आघाडी–महायुतीमध्ये चुरस; ७४ टक्के मतदान

■ महायुतीत शेवटच्या क्षणी गोंधळ, महाविकास आघाडीत नेतृत्वबदल; दोन्ही प्रमुख उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद – निकाल २१ डिसेंबरला

किनवट : (समर्थ गांवकरी)

किनवट नगर परिषद निवडणुकीचे मतदान (दि.०२) शांततेत पार पडले असून सुमारे ७४ टक्के मतदान झाले. या निवडणुकीच्या सुरवात महाविकास आघाडी व महायुती यांच्यात सरळ संघर्ष होता. या निवडणुकीच्या सुरवातीला महायुतीने निवडणुक आपली राजकीय रणनीती आयत्यावेळी ठरवल्याने त्यांच्याकडुन इच्छुक उमेदवारांना अपक्ष उमेदवारी दाखल करता आली नाही, तर काही जणांना नामांकन मागे घ्यावे लागले. तर काहींचे अधिकृत पक्षनिशी (A-B फॉर्म) न आल्याने उमेदवारी आपोआप रद्द झाली. तर दुसरीकडे महाविकास आघाडीत गोंधळ निर्माण झाला कारण मागील ८ वर्षांपासून शहरात महाविकास आघाडीचे प्रमुख उमेदवार म्हनुन वावरणारे माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी शेवटच्या क्षणी महायुतीमध्ये प्रवेश करुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची घडी बाधण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विस्कळीत झालेल्या महाविकासआघाडीची सूत्रे शिवसेना जिल्हा प्रमुख ज्योतिबा खराटे, रा.कॉ नेत्या बेबीताई, युवा नेते कपिल नाईक तसेच युवा नेते करण येंड्रलवार यांनी हातात घेतली व अखेरपर्यंत जोरदार लढा दिला.

प्रचारादरम्यान कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व वंचित बहुजन आघाडीचे सुजात आंबेडकर यांनी किनवटला भेट दिली. तसेच शिवसेनेतर्फे एका उमेदवाराकरिता नामदार हेमंत पाटील हे शहरात प्रचारासाठी आले होते. तर महायुतीच्या बाजूने आ.भिमराव केराम व ॲड.प्रतिक केराम यांनी किल्ला लढवला तर शेवटच्या सभेकरिता महानगराध्यक्ष प्रविण साले व जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख उपस्थित होते. मात्र भाजपाच्या नाराज गटाची सक्रियता शेवटपर्यंत दिसून आली नाही. या निवडणुकीत आ.भिमराव केराम यांनी पत्रकार परिषदेत "कॉस्मोपॉलिटन विचार" मांडण्याचा प्रयोग केला.

# मांजरम येथील श्री दत्त मंदिर येथे अखंड दत्तनाम सप्ताह प्रारंभ

नायगाव : (समर्थ गांवकरी)

नायगाव तालुक्यातील मांजरम ता. नायगाव येथील श्री दत्त मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही अखंड दत्त नाम सप्ताहाचे आयोजन भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागात सुरू आहे. दि. २८ नोव्हेंबर २०२५ पासून प्रारंभ झालेला हा सप्ताह ५ डिसेंबर २०२५ पर्यंत अखंड नामस्मरण, भजन, कीर्तन व धार्मिक उपक्रमांनी निनादात चालू राहणार आहे. गावभर उत्सवाचे वातावरण असून मंदिर परिसर भक्तांनी गजबजला आहे. दत्तप्रगट दिन विशेष कीर्तन – ४ डिसेंबर सप्ताहातील विशेष आकर्षण म्हणून दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी पवित्र दत्तप्रगट दिनानिमित्त भव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी ह.भ.प. बालाजी महाराज गुडेवार यांचे कीर्तन प्रायोजक भानू पाटील शिंदे यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे . भक्तीमय वातावरणात पार पडणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# क्रीडा महोत्सव २०२५ : आजच्या स्पर्धा – कबड्डी (मुले/मुली खेळाडू)

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

कबड्डी (मुले) या क्रीडा प्रकारात पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात सहा आणि दुपारच्या सत्रात सहा असे एकूण बारा सामने पार पडणार आहे. त्यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विरुद्ध वारणा विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या त पहिला सामना पार पडणार आहे. दुसरा सामना मुंबई विद्यापीठ, मुंबई विरुद्ध संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. तिसरा सामना डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई विरुद्ध महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर. चौथा सामना यजमान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विरुद्ध कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. पाचवा सामना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विरुद्ध गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि सहावा सामना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुद्ध महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यात होणार आहे.

दुपारच्या सत्रामध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर विरुद्ध कवी कुलगुरू संस्कृत विद्यापीठ, रामटेक. दुसरा सामना डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे विरुद्ध डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली. तिसरा सामना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर विरुद्ध वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी. चौथा सामना महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी विरुद्ध यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पाचवा सामना डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई विरुद्ध पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि सहावा सामना यजमान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांच्यात होणार आहे.

कबड्डी (मुली) या क्रीडा प्रकारात पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात सहा तर दुपारच्या सत्रात सहा सामने पार पडणार आहेत. त्यामध्ये मुंबई विद्यापीठ, मुंबई विरुद्ध वारणा विद्यापीठ, वारणानगर यांच्यात पहिला सामना पार पडणार आहे. दुसरा सामना एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई विरुद्ध संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. तिसरा सामना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुद्ध राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. चौथा सामना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर विरुद्ध महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी. पाचवा सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विरुद्ध यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि सहावा सामना डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली विरुद्ध गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्यात होणार आहे.

दुपारच्या सत्रामध्ये कबड्डी (मुली) या क्रीडा प्रकारात सहा सामने पार पडणार असून त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुद्ध कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा यांच्यात पहिला सामना पार पडणार आहे. दुसरा सामना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर विरुद्ध महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर. तिसरा सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विरुद्ध कवी कुलगुरू संस्कृत विद्यापीठ, रामटेक. चौथा सामना डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली विरुद्ध यजमान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्यात होणार आहे. पाचवा सामना मुंबई विद्यापीठ, मुंबई विरुद्ध कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यात तर सहावा सामना एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई विरुद्ध डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई यांच्यात रंगणार आहे.

# संचारसाथी ॲप : पाणी मुरते आहे, ते नेमके कुठे?



## संपादकीय

गेल्याच आठवड्यात केंद्रीय दूरसंचार खात्याने भारतात मोबाइल हँडसेट्स तयार करणाऱ्या आणि हँडसेट्स आयात करणाऱ्याही सर्व कंपन्यांना देशात तयार केल्या किंवा विकल्या जाणाऱ्या प्रत्येक मोबाइलमध्ये 'संचारसाथी' हे सरकारी ॲप प्री-इन्स्टॉल करून दिले पाहिजे, असा आदेश दिला. हे ॲप वापरकर्त्याला अनइन्स्टॉल किंवा डिसेबल करता येऊ नये आणि सध्या जे मोबाइल अस्तित्वात आहेत त्यांना पुढच्या ऑपरेटिंग सिस्टीमच्या अपडेटमध्ये हे ॲप इन्स्टॉल करण्याचाही आदेश होता. थोडक्यात, भारतातल्या प्रत्येक मोबाइलधारकाच्या मोबाइलवर हे ॲप इन्स्टॉल करणे बंधनकारक केले जाणार होते. ते बंद करणे किंवा काढून टाकणे हे अशक्यप्राय असणार होते. हे ॲप सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे असल्याचा सरकारचा दावा आहे. या ॲपमध्ये सध्या पाच प्रमुख सुविधा आहेत. ऑनलाइन आर्थिक फसवणुकीसाठी पाठवले गेलेले संशयास्पद मेसेजेस रिपोर्ट करणे, फोन हरवला, चोरीला गेला तर तो शोधणे अथवा ब्लॉक करू शकणे, आपल्या नावाने इतर कोणी कनेक्शन घेतली आहेत का हे तपासता येणे, हँडसेट ओरिजनल आहे की डुप्लिकेट हे तपासता येणे आणि भारतीय नंबर वापरून आंतरराष्ट्रीय कॉल येत असेल तर तो रिपोर्ट करणे. या सुविधा ग्राहकांसाठी उपयुक्तच आहेत. हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोन ट्रॅक अथवा ब्लॉक करण्याची सुविधा अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही प्रणालींमध्ये उपलब्ध असते. सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदवण्यासाठी सरकारनेच सायबर क्राइम पोर्टल तयार केले आहे. भारतीय नंबर वापरून आंतरराष्ट्रीय कॉल येत असेल तर त्याच पोर्टलवर त्याचीही तक्रार करता येऊ शकते. ॲपमधील या तीन सुविधा, ज्या सध्या इतर मार्गांनी सहज पूर्ण करता येतात, त्यांच्यासाठी एक वेगळे सरकारी ॲप का वापरावे हा कळीचा प्रश्न. उरलेल्या दोन सुविधा सध्या वापरात असलेल्या 'उमंग' सारख्या उपयुक्त ॲपमध्ये देता येणं शक्य असताना नवे ॲप कशासाठी?

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की हे ॲप इन्स्टॉल करून वापरण्याची सक्ती करण्यामागे सरकारचा उद्देश काय होता? उमंग किंवा डिजिलॉकरसारखी अत्यंत उपयुक्त सरकारी ॲप्स लोक स्वेच्छेने वापरतात. हे नवे ॲप उपयुक्त असेल तर ते स्वेच्छेने इन्स्टॉल करून लोक वापरतीलच की. शिवाय, 'हे ॲप अगदी निरूपद्रवी आहे आणि त्यातून तुमचा कुठलाही डेटा घेतला जाणार नाही' असे एकीकडे सांगत असताना, त्या ॲपला आपले फोन कॉल्स, एसएमएस, फाइल सिस्टीम, फोटो गॅलरी आणि कॅमेरा या सर्व गोष्टींचा ॲक्सेस द्यावा लागत आहे. या सर्व गोष्टींचा ॲक्सेस या ॲपला दिल्यानंतर भविष्यामध्ये फोनमधील सर्व डेटा गोळा करून तो सरकारी निरीक्षणासाठी पाठवला जाणार नाही याची काय शाश्वती आहे? आपल्या राज्यघटनेनुसार खासगी माहिती जपणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही सबळ कारणाशिवाय या माहितीवर पाळत ठेवणे, ती गोळा करणे, तिचा वापर करणे हे कोणतीही सरकारी यंत्रणा करू शकत नाही. नागरिकांच्या मोबाइलमध्ये त्यांची खासगी माहिती गोळा करण्याची क्षमता असलेले ॲप इन्स्टॉल करण्याची सक्ती करणे, हे घटनादत्त मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे. म्हणून सरकारच्या या आदेशाविरुद्ध अनेक नागरी संघटनांनी तीव्र आक्षेप नोंदवला आणि विरोध सुरू केला. नागरिकांचा हा विरोध बघून सरकारने अक्षरशः दोन दिवसांत हा आदेश मागे घेतला. आता ही सक्ती मागे घेतली असली तरी अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात; मुळात फोनच्या सर्व डेटाला ॲक्सेस असलेले ॲप इन्स्टॉल करण्याची सक्ती सरकार का करत होते? तो आदेश थेट मोबाइल कंपन्यांना का दिला होता? हे ॲप जर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आहे, तर त्यात असलेल्या सुविधांमधून नेमकी काय अधिकची सुरक्षितता मिळणार होती जी सध्याच्या व्यवस्थेतून मिळत नाही? हे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे होते, तर सक्ती तडकाफडकी मागे का घेतली? अर्थात, यातल्या कोणत्याच प्रश्नाचे उत्तर मिळण्याची शाश्वती नसली तरी नागरिक म्हणून आपण हे प्रश्न विचारत राहिले पाहिजेत.



## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ५४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 4 | | | 8 | | | 5 |
| | 2 | 8 | 7 | | 9 | | 4 | |
| 7 | | | 1 | | | 2 | 9 | 8 |
| | | | | 8 | | 1 | | |
| 4 | | | 2 | | 5 | | | 3 |
| | | 2 | | 7 | | | | |
| 2 | 5 | 1 | | | 7 | | | 9 |
| | 3 | | 4 | | 6 | 5 | 8 | |
| 8 | | | 5 | | | 3 | 1 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ५३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 4 | 6 | 5 | 9 | 2 | 1 | 3 |
| 3 | 2 | 6 | 1 | 4 | 8 | 7 | 5 | 9 |
| 9 | 5 | 1 | 2 | 7 | 3 | 6 | 4 | 8 |
| 8 | 9 | 2 | 4 | 1 | 5 | 3 | 7 | 6 |
| 6 | 4 | 3 | 8 | 2 | 7 | 5 | 9 | 1 |
| 5 | 1 | 7 | 9 | 3 | 6 | 8 | 2 | 4 |
| 2 | 3 | 8 | 5 | 9 | 4 | 1 | 6 | 7 |
| 1 | 7 | 9 | 3 | 6 | 2 | 4 | 8 | 5 |
| 4 | 6 | 5 | 7 | 8 | 1 | 9 | 3 | 2 |

### पंचांग

पंचांग
५डिसेंबर२०२५
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:प्रतिपदा

२४:५५:५४+
नक्षत्र:रोहिणी
११:४६:०३
योग:सिद्ध ०८:०७:४९
योग:साध्य २७:४८:२८+
करण:बालव १४:४८:२२

## उपदेशाचे डोस

### क्रिया-प्रतिक्रिया शाश्वत नियम

एक मुलगा जंगलात गेला होता. चहुकडे निर्जन, उजाड जंगलात हवा व झाडांचाच आवाज येत होता. तो मुलगा घाबरुन ओरडला, 'भूत'. तेव्हा त्याचा आवाज डोंगरांवर आदळून परतला व त्यास 'भूत' असे ऐकु आले. मुलाला वाटले की खरंच भूत आहे. तो हाताच्या मुठी आवळत जोराने ओरडला की, ''तू मला खाशील'' डोंगरावर आदळून त्याचा आवाज परतला व त्याला वाटले की भूत मला विचारत आहे. तेव्हा तो म्हणाला,''हो मी तुला खाईल'' हा आवाज त्याच्यापर्यंत आला तेव्हा मुलगा घाबरुन घरी गेला व त्याने आईला सर्व गोष्ट सांगितली. आईने वस्तुस्थिती जाणून घेत सांगितले की, आता जंगलात गेल्यावर तु त्या भूताला सांग की, माझ्या मित्रा मी तुझ्यावर प्रेम करतो. पुन्हा जेव्हा मुलगा जंगलात गेला तेव्हा ओरडला,''माझ्या जीवलग मित्रा'' डोंगरांवर आदळून त्याच शब्दांचा प्रतिध्वनी ऐकू आला आणि भूत आपल्याला घाबरवीत नाही, असे त्याच्या लक्षात आले. नंतर तो म्हणाला,''मी तुझ्यावर प्रेम करतो'' डोंगरावर आदळून हेच शब्द परत आले व मुलाच्या आनंदाला पारावर राहिला नाही. क्रियाची प्रतिक्रिया निसर्गाचा एक शाश्वत नियम आहे.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७९२- फ्रेंच क्रांतिकारांनी १६वा लुई या पदच्युत राजावर देशद्रोहाचा खटला चालविण्यास सुरुवात केली.
- २००४- बंगलूर येथे फुटबॉलचा सामना सुरू असताना ख्रिश्चन ज्युनियर या ब्राझिलियन फुटबॉलपटूचा मृत्यु.

### राष्ट्रीय

- १९८५ - महाराष्ट्रात पहिले महिला संरक्षणगृह नागपूर येथे सुरू.
- २००६ - लोकसभेने उत्तरांचलचे नाव बदलून 'उत्तराखंड' करण्यासंबंधीचे विधेयक मंजुर केले.
- २००६ - माजी केंद्रीय मंत्री आणि झामुमोचे नेता शिबू सोरेन यांना दिल्लीच्या एका स्थानिक न्यायालयाने सचिवाच्या हत्या प्रकरणात जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठवण्यात आली.


### जन्म

- १८३९- जनरल जार्ज कस्टर या अमेरिकी सेनानीचा जन्म.
- १८७५- डेलिया ज्युलिया डेनिंग ऐकली या आफ्रिकेत जाऊन संशोधन करणाऱ्या अमेरिकी संशोधिकेचा जन्म.
- १८९६- शरीरातील साखरेचे नक्की काय होते, हे शोधून काढणाऱ्या कार्लकोरी यांचा जन्म. त्यांना १९४७ चे नोबेल पारितोषिक मिळाले.
- १९०१- मिकी माऊसचा निर्माता वॉल्ट डिस्नेचा जन्म.

### निधन

- १७९१- ऑस्ट्रियन संगीतकार वुल्फगॅग एमेडियस मोझार्टचे निधन.
- १८७०- अलेक्झांडर ड्यूमा या महान फ्रेंच लेखकाचा मृत्यू.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ५४



### आडवे शब्द

१. '... दादा मला एक वहिनी अण'
१०. विशेष
१२. रात्रीचा पाऊस
१३. उमर
१४. वस्त्र, कापड
१६. शेतकरी
१७. युवती
१८. बरगडी
१९. घट्ट
२१. घरातील वरचा भाग
२२. कारभार, नस्ता उद्योग!
२३. गाय
२४. गोष्टीतील वनमानव (इंग्रेजी)
२६. दगड, लाकूड यांचा पातळ
२७. जनावर, माणूस इ.
२८. पोशाख (अनेक वचन)
३०. वृद्धत्व, म्हतारपण
३१. जोराचा रट्टा
३२. पादत्राण
३४. पिशाच, वेडा मनुष्य
३६. बारीक झिणझिण
३८. अपऱ्या नाकाचा
४०. अविवेकी, अतिरेकी कृत्य
४१. दिखाऊ, वरवर
४२. पुरुष
४३. पाणी उकळण्याचा आवाज
४६. शिष्य
४८. बाजेची कापडी पट्टी
४९. घटस्फोट
५१. रोखलेली नजर
५२. मलई
५३. तफावत, अंतर
५५. पारंब्याचा एक वृक्ष
५६. शुल्क
५७. जेमतेम
५९. आश्चर्य
६१. लज्जास्पद
६२. अभिनेता
६३. हयगय, दुर्लक्ष
६४. नंतर
६५. च्या बरोबर
६७. भीमाजवळचे शास्त्र
६८. एक कालवण
६९. सहाय्यक
७१. मरणारा, प्रतिस्पर्धी
७२. महाभारतातील वास्तुशास्त्रज्ञ
७३. आपला नसलेला
७४. राजवाड्यातील दालन
७५. सोंग वठवणारा
७६. पद्धतीप्रमाणे
७७. बांबू

### उभे शब्द

१. गौर वर्णाचा
२. पद्धत
३. पणजीचे राज्य
४. पर्जन्यकाळ
५. डोळे
६. अत्यंत किंमतीची, मौल्यवान
७. पाताळ
८. सौन्याच्या मुक्कामाची जागा
९. शीर, धमनी
११. सर्वत्र, चोहीकडे
१५. फायदा, तोटा
१६. कमीत कमी
१९. भांडण
२०. गरजू
२२. मेहरबानी
२५. पाण्याचा उगम
२६. केस
२७. जीव
२९. झटकम
३२. जुजबी
३३. अधाशी, लालची
३५. चालत चालत
३७. चुनखडीचा दगड
३९. वात्रट, चावट
४३. जाडसर पीठ
४४. शेंगेवरील साल
४५. शेवट, अखेर
४६. कैद
४७. हानी, तोटा करणारे
४८. नेत्रकटाक्ष
५०. कट्टर
५४. भांडण, खोडी
५८. केसांची लट
६०. माराची उमटलेली खूण
६३. नाविक दल
६४. कैफी, नशा आणणारे
६५. फटाक्याची माळ
६६. उगीच
६७. जाणे, प्रस्थान करणे
६९. जळलेला, करपलेला भाग
७०. युद्ध
७१. धनी
७३. पान

### शब्दकोडे क्र. ५३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.बुगडी माझी सांडली ग जाता साताऱ्याला १०.गार ११.जस्त १२.मस १४.संगम १६.सडा १७.पाव १८.दादा १९.सनई २१.वाटचाल २२.शरद २३.समजदार २६.गवत २८.नर ३०.दंग ३१.मजा ३३.वट ३६.मकर ३८.सावड ४०.जनगणमन ४३.महिना ४५.भेदक ४७.खातमा ४८.उदर ४९.सर ५०.मुलगा-मुलगी ५२.लगदा ५३.वाटप ५५.दरड ५७.जावक ५८.रजनीकर ६१.बाग ६३.पारधी ६५.डमरु ६६.रणरण ६७.कवी ६८.तजवीज ७०.मज ७१.तर ७२.रीत ७३.कौरव ७४.तवंग ७६.वाकडा ७७.सखा ८०.तरुणाई ८१.भाग्य ८२.रुप ८३.सवलत ८४.टवटवीत

उभे उत्तर : २.गवगवा ३.माग ४.सांगाडा ५.डर ६.गजवदन ७.जास्त ८.साम दाम दंड भेद ९.तास १३.ताई १५.मटकी १६.सलग १७.पार १८.दास १९.सदा २०.नरम २२.शतक २४.जग २५.सावज २७.वमन २९.रसना ३२.जादूगार ३४.टन ३५.पण ३७.रमत ३९.भोक ४१.गजगामिनी ४२.उदाहरण ४९.सपक ५०.मुजोर ५१.गीर ५४.टवटवी ५६.डबा ५९.जरतर ६०.कडवी ६२.गरजवंत ६३.पारखी ६४.परत ६७.करडा ६९.जवस ७०.मत ७१.तक ७२.रीतभात ७३.कौलारू ७५.गरुड ७६.वाईट ७८.खास ७९.पाल

# डिसेंट फाउंडेशनतर्फे दिव्यांगांची स्वावलंबनाकडे वाटचाल

**जुन्नर तालुका:** (समर्थ गांवकरी)

3 डिसेंबर 2025 रोजी जागतिक दिव्यांग दिना निमित्त निमगाव तर्फे महाळुंगे येथील दिव्यांग बांधव शैलेश पांडुरंग घुले यांना जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधत डिसेंट फाउंडेशन,पुणे यांच्या वतीने सोलारवर चालणारी तीन चाकी इलेक्ट्रिक सायकल प्रदान करण्यात आली.पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करून दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनवण्याच्या दिशेने फाउंडेशनचा हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या सायकल वितरण कार्यक्रमास



डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, संचालक आदिनाथ चव्हाण,विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक वैभव कोरडे,विकास ताम्हाणे, तसेच रामकृष्ण भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती. डिसेंट फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबनाकडे नेणे हा एक मुख्य उद्देश आहे.या उद्देशातून प्रेरित होऊन फाउंडेशनतर्फे आत्तापर्यंत तब्बल ४०० हून अधिक तीनचाकी इलेक्ट्रिक सायकलींचे वाटप करण्यात आले आहे.

या माध्यमातून अनेक दिव्यांगांच्या जीवनात परिवर्तन घडून येत असून त्यांच्या दैनंदिन प्रवासात, कामधंद्यात आणि समाजातील सहभागात मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. यावेळी संस्थापक जितेंद्र बिडवई म्हणाले,"दिव्यांग व्यक्तींना सहानुभूतीची नव्हे, स्वावलंबनाची गरज आहे.

म्हणूनच डिसेंट फाउंडेशन त्यांच्या 'स्वतंत्र प्रवासाला' नवी दिशा देण्याचा प्रयत्न सातत्याने करत आहे.आगामी काळात आणखी अधिकाधिकलाभार्थ्यां पर्यंत हा उपक्रम पोहोचवण्याचा आमचा मानस आहे."

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त राबविण्यात आलेला हा उपक्रम स्थानिक स्तरावरून मोठ्या प्रमाणात कौतुका स्पद ठरला आहे.



ठाणे, दिवा : दिवा शहरात क्रिकेट व फुटबॉल प्रेमींसाठी आनंदाची बाब ठरेल असे बेडेकर नगर येथे भव्य बॉक्स S Y टर्फ चे उदघाट्न मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या हस्ते करण्यात आले. दिव्यातील शुभम बेडेकर, वैभव बेडेकर, टिनू बेडेकर आणि योगेश गावानग यांनी पुढाकार घेत युवा वर्गाला क्रिकेट व फुटबॉलसाठी एक व्यासपीठच उपलब्ध करून दिले आहे. सदर भव्य दिव्य टर्फ उभरल्यामुळे या सर्वांचे अभिनंदन व कौतुक मा. रमाकांत मढवी यांनी केले आहे.

## थोडक्यात बातम्या...



### माहूर गडावर लाखो भाविकांनी घेतले भगवान दत्तप्रभूंचे दर्शन

माहूर (स. गांवकरी) : गुरुवार, दिनांक ४ (पौर्णिमा) रोजी माहूर गडावरील श्री दत्तात्रेय संस्थान येथे दत्तजयंतीनिमित्त भाविकांची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली. हातात निशाण, मुखी "दत्ता दिगंबरा... देवा दत्ता दत्ता"चा जयघोष — या गजरात संपूर्ण माहूर गड दुमदुमून गेला. सभोवतालच्या जिल्ह्यांसह राज्यभरातून भाविकांनी २ डिसेंबरपासूनच मोठ्या संख्येने हजेरी लावत दत्तजन्मोत्सव भक्तिरसात साजरा केला. काल दि ३ डिसेंबर रोजी दत्तजयंतीनिमित्त गडावरील दत्तशिखर संस्थान येथे भगवान श्री दत्तप्रभूंचा जन्मसोहळा भक्तिभावात संपन्न झाला. गडाचे महंत परमपूज्य श्री श्री मधुसूदन भारती महाराज यांच्या शुभहस्ते दुपारी २ वाजता अभिषेक, समाधीपूजन व जन्मसोहळा विधिवत पार पडला. हजारो दत्तभक्तांनी या पावन सोहळ्यास उपस्थिती लावली. अभिषेकानंतर सभामंडपात दत्तसोहळा झाला. पोथीवाचनानंतर जन्मसोहळा व दत्तजन्म अध्याय वाचन ऋषिकेश जोशी यांनी केले. मुख्य पुजारी वासुदेव भारती महाराज यांच्यासह चिरंजीव भारती, हरिहर भारती, सुजान भारती, नितेश भारती, माधव गिरी, विलासराव जोशी, रवींद्र जोशी, विकास जोशी तसेच साधुसंत व उत्सव मंडळी उत्साहात सहभागी झाले होते. आज गुरुवारी श्री दत्तजयंतीनिमित्त भाविकांच्या सोयीसाठी ग्रामसेवक संघटना, पंचायत समिती कर्मचारी, विविध सामाजिक संस्था व नागरिकांच्या वतीने मोफत महाप्रसादाचे अनेक स्टॉल उभारण्यात आले. स्वामी समर्थ अन्नछत्र येथेही हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. माहूरच्या साईनाथ महाराज मठ तसेच श्री आनंद दत्तधाम आश्रमात यंदाही पुरणपोळी व आमरस प्रसादाची परंपरा कायम ठेवत भाविकांसाठी महाप्रसादाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.




### शेतीपंपांना दिवसा वीज पुरवठ्याबाबत खा. अशोक चव्हाण यांनी लक्ष वेधले

नांदेड (स. गांवकरी) : शेतकऱ्यांवरील वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांची वाढती संख्या लक्षात घेता केंद्र सरकारने देशातील सर्व राज्यांशी समन्वय साधून शेतीपंपांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्याबाबत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी आज संसदेचे लक्ष वेधले. राज्यसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात मानव-वन्यप्राणी संघर्षाबाबत खा. सी. षण्मुगम यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर चर्चेत सहभाग घेताना खा. चव्हाण बोलत होते. शेतकऱ्यांवर होणाऱ्या वन्यप्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांविषयी चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की, साधारणपणे कृषीपंपांना रात्री वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी अंधारात शेतात जावे लागते आणि या वेळेत वन्यप्राण्यांच्या हल्ल्याची शक्यता अधिक असते. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राज्यांशी समन्वय साधून शेतीपंपांना दिवसा वीजपुरवठा करण्याचा निर्णय घेतल्यास अशा हल्ल्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते, अशी सूचना त्यांनी मांडली. याशिवाय वन्यप्राणी शेतात घुसून पिकांची मोठ्या प्रमाणात हानी करतात, त्यामुळे वनक्षेत्रालगतच्या शेतीभागांत कुंपण उभारण्यासारख्या उपाययोजनांची गरज असल्याचेही खा. चव्हाण यांनी नमूद केले. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी खा. अशोकराव चव्हाण यांच्या सूचनेचे स्वागत केले. वनक्षेत्रांच्या सीमेजवळ मानवी वस्तीमध्ये हल्ल्याच्या घटना वाढत असतील, तर आवश्यकतेनुसार असे भाग निश्चित करून तिथे वन्यजीव व्यवस्थापन योजनेंतर्गत सीमांकन केले जाते, असे ते म्हणाले.

### वसरणी परिसरातील तरुणाचा विद्युतप्रवाहाचा धक्का बसून मृत्यू

नांदेड (स. गांवकरी) : वसरणी परिसरात आज दुपारी घडलेल्या हृदयद्रावक घटनेत रोहित मीठुलाल मंडले (वय २३ वर्षे) या तरुणाचा ३६ केव्ही विद्युत प्रवाहाचा तीव्र धक्का बसून जागीच मृत्यू झाला. रस्त्यालगत असलेल्या उच्चदाब वाहिनीच्या संपर्कात आल्याने हा अपघात घडल्याची प्रारंभिक माहिती मिळाली आहे. रोहित हा मूळचा जुने नांदेड, होळी परिसरातील बुरुड गल्ली, नावघाट येथील रहिवाशी होता. आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तो वसरणी परिसरातील शेतात काम करण्यासाठी गेला होता. दरम्यान, दुर्दैवाने घडलेल्या या अपघाताने संपूर्ण कुटुंबावर दुःखांचा डोंगर कोसळला आहे. मागील वर्षीच रोहितचे विवाह झाले होते. त्याची पत्नी सध्या गरोदर असल्याची माहिती त्यांचे सासरे चंदन यादव यांनी दिली. अधिक वेदनादायी बाब म्हणजे यापूर्वीच एका अपघातात रोहितचा मोठा भाऊ यांचे निधन झाला होता. आता घरात कमवणारा एकही सदस्य उरलेला नाही. वृद्ध आई-वडील आणि गरोदर पत्नी अशी परिस्थिती असताना कुटुंब पूर्णपणे उपजीविकेच्या आधाराविना उभे आहे. या अचानक झालेल्या दुर्दैवी मृत्यूने संपूर्ण परिसर शोकसागरात बुडाला असून, समाजबांधव आणि नातेवाईकांनी शासनाने तत्काळ आर्थिक मदत, सरकारी नोकरी किंवा नुकसानभरपाई द्यावी, अशी एकमुखाने मागणी केली आहे. कुटुंबाच्या आयुष्याची घडी पुन्हा बसविण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे अत्यावश्यक असल्याचे स्थानिकांनी सांगितले आहेत.

# अहिल्यानगर महानगरपालिकेच्या यादीवर ९ हजार ६०७ हरकती

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

महानगरपालिकेच्या प्रारूप मतदार यादीवर बुधवारी शेवटच्या दिवसाअखेर तब्बल ९ हजार ६०७ हरकती प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकतीची स्थळ पाहणी करून निपटारा करण्यात येणार असून, संबंधित कार्यवाही महापालिकेकडून सुरू करण्यात आली आहे. महापालिका निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार महापालिका आयुक्तांनी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली होती. त्यावर गेल्या दि. २८ नोव्हेंबरपर्यंत हरकती सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. यासाठी अर्जाचे अ व ब नमुने उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच, एकत्रित हरकती न घेता स्वतंत्र अर्ज सादर करण्याच्या




सूचनाही देण्यात आल्या होत्या.

त्यावर काही हजार हरकती प्राप्त झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने हरकती स्वीकारण्याची मुदत वाढवली. त्यानुसार ३ डिसेंबरपर्यंत हरकती दाखल करण्याची संधी देण्यात आली. प्राप्त हरकतींवर सुनावणी घेऊन १९ डिसेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याच्या सूचना आयोगाने दिल्या आहेत. महापालिकेच्या चारही प्रभाग समिती कार्यालयांमधून ३ डिसेंबरपर्यंत एकूण ९ हजार ६०७ हरकती प्राप्त झाल्याची माहिती प्रशासनाने दिली. दरम्यान, हरकतींची पडताळणी आणि स्थळ पाहणीची प्रक्रिया महापालिकेकडून सुरू करण्यात आली आहे. महापालिकेचे कर्मचारी व बीएलओ थेट मतदारांच्या घरी जाऊन तपासणी करत आहेत.

पुढील नियोजनानुसार १५ डिसेंबर रोजी मतदान केंद्रांची यादी, तर २२ डिसेंबर रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रकाशित करण्यात येणार आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करत जीवे मारण्याची धमकी

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर येथील एका अल्पवयीन शाळकरी मुलीचा पाठलाग करून, धमकावून आणि वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवत अत्याचार केला. अत्याचार करणारा संशयित युवकाची इंस्टाग्रामवरून ओळख झाल्यानंतर तो पीडितेला वारंवार त्रास देत असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीने (वय-१५) सोमवारी (१ डिसेंबर) रात्री दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात संशयित आरोपी युवकाविरूध्द विनयभंग, अत्याचार, पोक्सो आदी कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पीडित मुलगी अहिल्यानगर येथील एका शाळेत शिक्षण घेते. इंस्टाग्रामवरून तिची आरोपीसोबत ओळख झाली होती. त्यानंतर आरोपीने मुलीच्या शाळेजवळ येऊन तिचा पाठलाग करणे सुरू केले.

१७ जुलै २०२५ रोजी सायंकाळी मुलीला थांबवून आरोपीने तिचा हात धरून तिला ओढण्याचा प्रयत्न केला. मुलीने आरडाओरड केल्यावर आरोपीने तिला व तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली. या धमकीनंतर त्याने मुलीला अनेक वेळा शाळा सुटल्यावर धमकावून आपल्या दुचाकीवरून घेऊन जात होता. तपोवन रस्ता परिसरात सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी नेऊन त्याने तिच्यासोबत गैरवर्तन केले.

# व्यक्तिमत्व जडणघडणीत वक्तृत्व कला काळाची गरज

**जुन्नर तालुका :** (समर्थ गांवकरी)

श्री शिव छत्रपती महाविद्यालयात वादविवाद व वक्तृत्व मंडळाचे उद्धघाटन समारंभ नुकतेच संपन्न झाले या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून पुणे येथील डॉ पांडुरंग कंद हे होते.संस्थेचे अध्यक्ष ॲड संजय शिवाजीराव काळे यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव वाघमारे होते.प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.विलास कुलकर्णी,उपप्राचार्या व समन्वयक प्रा.प्रतिभा लोढा,पर्यवेक्षक प्रा.समीर श्रीमंते व एमसीव्हीसी विभागप्रमुख प्रा.कुंडलिक नेटके व वरिष्ठ विभाग वादविवाद वक्तृत्व मंडळाचे प्रमुख डॉ. वंदना नढे,कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा.सारीका सोनार व प्राध्यापक वृंद,विद्यार्थी यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा सारीका सोनार यांनी केले तर पाहुण्याचा परिचय प्रा योगेश घोडके यांनी करून दिला या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ.पांडूरंग कंद यांनी वक्तृत्व कला ही प्रत्येकानी आत्मसात करावी मानवी जीवन समृद्ध करण्याकरीता व व्यक्तिमत्व जडणघडणीसाठी वक्तृत्व कला ही काळाची गरज आहे.

# नांदेडसाठी सीआरआरआय ट्रॅफिक सर्वेक्षण मार्गी

- खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश

**नांदेड :** (समर्थ गांवकरी)

शहरातील वाढत्या वाहतूक समस्येवर वैज्ञानिक समाधान शोधण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना अखेर मोठे यश मिळाले आहे. राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी मागील एक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केलेल्या या विषयावर केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. राज्यसभेत विचारलेल्या अतारांकित प्रश्न क्रमांक ६०४ ला उत्तर देताना



केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह यांनी नांदेडसाठी वाहतूक सर्वेक्षण करण्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली.

CSIR-CRRI या देशातील अग्रगण्य संशोधन संस्थेकडे नांदेडसाठी एप्रिल 2025 मध्ये ट्रॅफिक सर्वेक्षणाचा प्रस्ताव सादर केला होता. तख्त श्री हजूर साहिब नांदेड हे देशातील एक प्रमुख शीख तीर्थक्षेत्र असल्याने, संस्थेकडे सर्वेक्षण शुल्कात सवलत देण्याची विनंती करण्यात आली होती. या विनंतीवर सकारात्मक विचार करून CRRI ने सप्टेंबर 2025 मध्ये सुधारित प्रस्ताव महापालिकेकडे पाठवला असून त्यात अनुदान व शुल्क सवलतींचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे ट्रॅफिक सर्वेक्षण प्रत्यक्ष सुरू होण्यासाठी महत्त्वाचा टप्पा पार झाला आहे.

या पार्श्वभूमीवर, सवलत मिळाल्यानंतर उर्वरित 82 लाख साठ हजार रुपयांचे सर्वेक्षण शुल्क नांदेड जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर करून महापालिकेला मदत म्हणून वर्ग करावे, अशी मागणी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी पालक मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीकडे औपचारिकरित्या केली आहे. या निर्णयामुळे महापालिकेवरील आर्थिक भार कमी होऊन शहराला उच्च दर्जाच्या वाहतूक व्यवस्थापन अभ्यासाचा थेट लाभ मिळणार आहे.

# मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूने नाली करण्याची मागणी



**कंधार :** (समर्थ गांवकरी)

शहरातील शासकीय वसाहत असलेल्या राम रहीम नगर येथे शेख जिलानी यांच्या घरापासून ते शहा सुलतान यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीटच्या मोठ्या नालीचे बांधकाम करण्यात यावे.अशी मागणी राम रहीम नगर येथील नागरिकांच्या वतीने उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग कंधार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग कंधार अंतर्गत गुत्तेदाराकडून लॉ कॉलेज ते जाधव हॉस्पिटल पर्यंतच्या सीसी रस्त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.परंतु याच रस्त्याच्या दोन्ही बाजूने सिमेंट कॉंक्रीट ची मजबूत नाली लॉ कॉलेज ते लुंगारे दिगंबर पाटील यांच्या शेतापर्यंत बांधण्यात आली आहे.मात्र तेथून पुढे अद्यापही नालीचे बांधकाम सुरू करण्यात आले नाही.रामरहीम नगर येथीही नाली नसल्याने नागरिकांना पावसाळ्यात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरणार आहे.त्यामुळे किमान रामरहीम नगर या शासकीय वसाहतीतील शेख जिलानी यांच्या घरापासून ते शहा सुलतान यांच्या घरापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने सिमेंट कॉंक्रीटच्या मोठ्या नालीचे बांधकाम करून प्रशासनाने भविष्यात होणारे नुकसान टाळावे.अशी मागणी सदरील निवेदनाद्वारे करण्यात आली.

# किनवट नगर परिषद मतदान शांततेत पार

**किनवट :** (समर्थ गांवकरी)

किनवट नगर परिषद निवडणुकीचे मतदान (दि.०२) शांततेत पार पडले असून सुमारे ७४ टक्के मतदान झाले. या निवडणुकीच्या सुरवात महाविकास आघाडी व महायुती यांच्यात सरळ संघर्ष होता. या निवडणुकीच्या सुरवातीला महायुतीने निवडणुक आपली राजकीय रणनीती आयत्यावेळी ठरवल्याने त्यांच्याकडुन इच्छुक उमेदवारांना अपक्ष उमेदवारी दाखल करता आली नाही, तर काही जणांना नामांकन मागे घ्यावे लागले. तर काहींचे अधिकृत पक्षनिशी (A-B फॉर्म) न आल्याने उमेदवारी आपोआप रद्द झाली. तर दुसरीकडे महाविकास आघाडीत गोंधळ निर्माण झाला कारण मागील ८ वर्षांपासून शहरात महाविकास आघाडीचे प्रमुख उमेदवार म्हनुन वावरणारे माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी शेवटच्या क्षणी महायुतीमध्ये प्रवेश करुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची घडी बाधण्याचा निर्णय घेतला.

# क्रीडा महोत्सव : २७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव

**नांदेड जिल्हा :** (समर्थ गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आयोजित २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ ला आज (४ डिसेंबर) उत्साहपूर्ण सुरुवात झाली. व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो, टेबल टेनिस, बॅडमिंटन, बुद्धिबळ आणि ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारांच्या सामन्यांना राज्यभरातील २४ विद्यापीठांच्या खेळाडूंचा उल्लेखनीय प्रतिसाद लाभला. मैदानावर कौशल्य, वेग, रणनीती आणि जिद्दीची चमकदार मैफल रंगली. कबड्डी स्पर्धेतील रोमांचकारी सामने: कबड्डी या क्रीडा प्रकारात आज एकापेक्षा एक चुरशीचे सामने खेळवण्यात आले. प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी



अप्रतिम पकड, टाळ्या मिळविणारे चढाईचे डाव आणि तगडी बचावशैली सादर केली. कबड्डी (मुली) या क्रीडा प्रकारात मुंबई विद्यापीठ, गडचिरोली विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई, कोल्हापूर विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठ तर कबड्डी (मुले) या क्रीडा प्रकारात पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, डॉ. होमी भाभा विद्यापीठ, मुंबई, जळगाव विद्यापीठाच्या संघानी विजय मिळवत प्रभावी कामगिरी नोंदवली. खो-खो स्पर्धेत रोमांचक सामन्यांची मालिका — यजमान नांदेड विद्यापीठाचा थरारक विजय स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवांतर्गत खो-खो स्पर्धेतील मुले व मुलींचे सामने अतिशय रोमांचक झाले. प्रत्येक सामन्यात खेळाडूंच्या चपळाई, वेग आणि हुशार रणनीतीची विलक्षण जुगलबंदी पाहायला मिळाली. खो-खो (मुले) या स्पर्धेच्या चुरशीच्या सामन्यांत विजयी संघांची चमक पहावयास मिळाली. यामध्ये यजमान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, अमरावती विद्यापीठाच्या संघांनी तर खो-खो (मुली) या स्पर्धेत मुंबई विद्यापीठ, महिला विद्यापीठ, मुंबई, पुणे विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठाच्या संघांनी विजय मिळविला.

बास्केटबॉल स्पर्धेत खेळाडू संघांनी विजयाची जिद्द आणि संघभावनेचे उत्तम प्रदर्शन करत स्पर्धेची रंगत उंचावली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा महोत्सवातील बास्केटबॉल स्पर्धेला आज उत्साहपूर्ण सुरुवात झाली. मैदानावर उतरताच खेळाडूंनी अचूक पासिंग, वेगवान ड्रिब्लिंग आणि प्रभावी शूटिंगची चमकदार मेजवानी साकारली. राज्यातील विविध विद्यापीठांतील खेळाडू संघांनी विजयाची जिद्द आणि संघभावनेचे उत्तम प्रदर्शन करत स्पर्धेची रंगत उंचावली.

पहिल्याच दिवसापासून सामन्यांमध्ये चुरस वाढल्याने प्रेक्षकांचा उत्साह आणि टाळ्यांचा कडकडाट सतत दुमदुमत राहिला. बास्केटबॉल (मुली) स्पर्धेत अमरावती विद्यापीठ, लोणेरे विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ, आरोग्य विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाच्या संघांनी तर बास्केटबॉल (मुले) स्पर्धेत कोल्हापूर विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ, होमी भाभा विद्यापीठ, मुंबई आणि नागपूर विद्यापीठाच्या संघांनी विजय मिळवत प्रभावी कामगिरी केली.

# शिक्षणक्षेत्रातील उज्ज्वल दीप—प्राचार्य दिलीप भुजबळ यांचा गौरव

■ पंचायत समिती श्रीगोंदा तर्फे 'कृतिशील मुख्याध्यापक' तालुकास्तरीय पुरस्कार प्रदान

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी अक्षरांचे ज्ञान नसून विद्यार्थ्यांच्या जीवनात उज्ज्वल प्रकाश निर्माण करणारी एक संस्कारांची प्रक्रिया आहे. हा प्रकाश जो शिक्षक आपल्या कृतीतून इतरांच्या आयुष्यात पसरवतो, तोच खऱ्या अर्थाने गुरु आणि मार्गदर्शक ठरतो. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, श्रीगोंदा येथील प्राचार्य श्री. दिलीप दगडू भुजबळ यांना पंचायत समिती श्रीगोंदा तर्फे प्रदान करण्यात येणारा तालुकास्तरीय 'कृतिशील मुख्याध्यापक' पुरस्कार जाहीर झाल्याने संपूर्ण तालुक्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

भुजबळ सरांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात एक समर्पित इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून झाली. विद्यार्थ्यांशी आत्मीय नाते जपत, विषयाची गोडी निर्माण करणारी अध्यापनशैली, शिस्तप्रिय वृत्ती व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेली मेहनत, यामुळे ते अल्पावधीतच विश्वासू मार्गदर्शक म्हणून ओळखले जाऊ लागले. यानंतर गुरुकुल प्रमुख म्हणून त्यांनी शिस्त, संस्कार आणि गुणवत्ताधारित शिक्षणाचा सुयोग्य समन्वय साधत आदर्शवत कार्य केले. उपमुख्याध्यापक पदावर कार्यरत असताना त्यांनी राबवलेला 'पाढे पाठांतर उपक्रम' विद्यार्थ्यांच्या गणितीय पायाभरणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरला. प्राचार्यपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर भुजबळ सरांनी विद्यालयाला नवी ओळख मिळवून दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली— स्पर्धा परीक्षांमधून रयत संस्थेतील सर्वाधिक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी घडले क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली स्काऊट–गाईड विभागातून राष्ट्रपतींना मानवंदना देणारे विद्यार्थी घडले अनेक विद्यार्थी राज्य पुरस्कारांचे मानकरी ठरले विद्यार्थ्यांच्या यशाबरोबरच शिक्षक व शिक्षकेतर सेवकांमध्येही त्यांनी संघभावना निर्माण करून 'शाळा म्हणजे कुटुंब' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक व व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या भारत स्काऊट आणि गाईड चळवळीतही भुजबळ सरांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची अहिल्यानगर जिल्हा भारत स्काऊट व गाईड संघटनेच्या सहाय्यक जिल्हा आयुक्तपदी निवड करण्यात आली आहे. भुजबळ सरांच्या नेतृत्वाखाली विद्यालयाने अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त केले आहेत, त्यामध्ये—

रयत शिक्षण संस्थेचा ॲड. रावसाहेब शिंदे उपक्रमशील शाळा पुरस्कार मुख्यमंत्री 'माझी शाळा – सुंदर शाळा' स्पर्धेत प्रथम क्रमांक




ठाणे : दिव्यात ग्रेस स्कूल व विद्याज्योती स्कूल आयोजित जागतिक अपंग दिनानिमित्त भव्य रॅली काढण्यात आली. दिव्यांग किंवा अपंग मुले ही समाजाचा एक घटक असून त्यांना सहकार्य करण्याचे आवाहन ग्रेस स्कुलच्या संचालिका सौ. सुवर्णा तांबे यांनी केले. प्रसंगी भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. सपना रोशन भगत यांनी देखील आपला सहभाग नोंदवला. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

श्रीगोंदा (स. गांवकरी) : संविधान दिन हा भारतीय लोकशाही संस्कृतीचा गौरव करणारा दिवस असून, विविधतेतून एकतेचा संदेश भारतीय संविधान देते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांवरच भारतीय लोकशाही उभी आहे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. प्रकाश साळवे यांनी केले. ते महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात आयोजित संविधान दिन कार्यक्रमात बोलत होते. संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. महादेव जरे होते. त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अर्चना फुलारी, निवडणूक साक्षरता मंडळाचे प्रमुख व नोडल अधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र ठाकरे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. भाऊ बुलाखे, प्रा. देवेंद्र बहिरम व प्रा. संजय फटे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. राहुल गायकवाड, प्रा. रमेश थोरात, डॉ. रावसाहेब काळे, डॉ. सुप्रिया पवार, प्रा. उंडे, प्रा. ससाणे, प्रा. इंगळे, प्रा. सिद्धार्थ बर्वे, प्रा. वैशाली घोडके, प्रा. रायकर, प्रा. नाना वागस्कर, प्रा. शेंडगे यांच्यासह सर्व प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संजय फटे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### पहाटे घरी जात असताना वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात आदिवासी शेतकऱ्याचा मृत्यू ?

अकोले (स. गांवकरी) : एका 55 वर्षाच्या आदिवासी शेतकऱ्याचा वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे कोथळे तालुका अकोले येथील कोंडीबा गोविंद भांगरे हे जवळच असणाऱ्या लव्हाळी कोतुळ येथे नवरात्र उत्सवाच्या कार्यक्रमाला सायंकाळी गेले होते लव्हाळी कोतुळ येथे मंदिरात नवरात्र उत्सवाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर त्याच ठिकाणी त्यांनी जेवण केले त्यानंतर मंदिरात भजनाचा कार्यक्रम ऐकला स्थानिक नागरिकांनी त्यास अंथरून पांघरून दिले उशीर झाल्याने मंदिरातच मुक्काम केला त्यानंतर पहाटे पायी प्रवास करत आपल्या कोथळा गावाकडे पायी येत असताना वन्य प्राण्याच्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे रात्री दोन ते अडीच च्या दरम्यान पर्यंत कोंडीबा भांगरे हे मंदिरात झोपलेले होते असे स्थानिक नागरिकांनी सांगितले त्यानंतर घरी परतत असताना ही घटना घडली असण्याची शक्यता व्यक्त होत आहे 24 सप्टेंबर 2025 रोजी ही घटना घडली त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्याचे नातेवाईकांनी हरिश्चंद्र गड परिसरात शोधा शोध केली मात्र त्याचा अद्यापही शोध लागला नाही कोंडीबा भांगरे यांचे बंधू किसन गोविंद भांगरे यांनी याबाबत राजुर पोलीस तक्रार दिली असून राजुर पोलिसांनी मिसिंगचा पुन्हा दाखल केला आहे तीन महिन्यानंतरही कोंडीबा भांगरे यांचा शोध लागत नसल्याने कोंडीबा भांगरे हे वन्य प्राण्याची शिकार झाल्याचे बोलले जात आहे गेल्या तीन महिन्यापासून सदर व्यक्तीचा शोध लागत नसल्याने परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान अकोले तालुक्यात रान डुक्कर , बिबटे यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात वाढल्याने सायंकाळी प्रवास करणे घराबाहेर पडणे धोक्याचे बनले आहे सायंकाळी व पहाटे मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांची संख्याही रोडवली आहे बिबट्यांचा मुक्त वावर वाढल्याने घराबाहेर पडण्यास नागरिक धजावत नाही.

### सुभद्राबाई दिनकर घोडके यांचे ९५व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन



श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील आदरणीय व ज्येष्ठ नागरिक सुभद्राबाई दिनकर घोडके यांचे दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९:०० वाजता वृद्धापकाळाने शांतपणे निधन झाले. त्या ९५ वर्षांच्या होत्या. सुभद्राबाई घोडके या स्वभावाने अत्यंत संयमी, प्रेमळ आणि कुटुंबवत्सल होत्या. संपूर्ण आयुष्य त्यांनी कुटुंब, नातेसंबंध आणि सामाजिक जिव्हाळा जपत व्यतीत केले. गावातील सर्वांनी त्यांना एक आदर्श आणि कर्तव्यदक्ष ज्येष्ठ ज्येष्ठी म्हणून मान दिला होता. त्यांच्या पश्चात मुलगा दीपक दिनकर घोडके, सुना, नातवंडे असा भक्कम व मोठा परिवार आहे. संपूर्ण घोडके कुटुंबासाठी तसेच त्यांना ओळखणाऱ्या प्रत्येकासाठी त्यांचे जाणे अत्यंत दुःखदायक आहे. निधनाची वार्ता समजताच परिसरात शोककळा पसरली आहे. सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी घोडके कुटुंबियांना सांत्वनपर संदेश दिले आहेत.

### श्री दत्तजयंतीनिमित्त श्री दत्त जन्मोत्सव व महाआरती

अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्री दत्तजयंतीनिमित्त सावेडीतील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र चॅरिटेबल ट्रस्ट श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताहात रात्रंदिवस प्रहर सेवा, दैनंदिन आरती तसेच गणेश याग, स्वामी याग, रुद्र याग, चंडी याग, मल्हारी याग या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काल सकाळी नित्य स्वाहाकार, बलि पूर्णाहुती, दुपारी १२:३९ वा. श्रीदत्त जन्मोत्सव व महाआरती संपन्न झाली असून ५ डिसेंबरला श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताह महाप्रसादाने सांगता होईल.

# श्रीगोंदा कन्या विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)




श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा तसेच पंचायत समिती शिक्षण विभाग, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक दिव्यांग दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी मा. कुसुमकुमारी कानडी या उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य मा. कुंडलिकराव दरेकर, मा. सौ. जोत्स्ना भंडारी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष मा. पीटर रनसिंग, प्रहार दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष श्री. सुरेश गलांडे, सचिव श्री. सुधीर भालेराव, शहराध्यक्ष सचिव श्री. तोडकर, शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी श्री. निळकंठ बोरुडे, केंद्रप्रमुख श्री. माणिकराव आढाव, उपमुख्याध्यापिका सौ. निलीमा कातोरे, श्री. बापूराव औटी, श्री. राजेंद्र बारगुजे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात हेलेन किलर व लुईस ब्रेल यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. दिव्यांग सक्षमीकरण, सर्वसमावेशक शिक्षण व सामाजिक संवेदनशीलता या विषयांवर विद्यार्थिनींनी प्रभातफेरी काढून समाजात जनजागृती केली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. वर्षा भोईटे यांनी प्रास्ताविकपर भाषणात दिव्यांग व्यक्तींप्रती समाजातील सकारात्मक दृष्टिकोन अधिक दृढ होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. शाळेमार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. या प्रसंगी दिव्यांग विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांचा विशेष सत्कार करून त्यांच्या क्षमतेचा व प्रयत्नांचा गौरव करण्यात आला. तसेच उपस्थित मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात मा. कुसुमकुमारी कानडी यांनी दिव्यांग व्यक्तींमध्ये असलेल्या मानसिक शक्तीचा गौरव करत त्यांना शुभेच्छा दिल्या व समाजाने अधिक संवेदनशील भूमिका घेण्याचे आवाहन केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पंचायत समितीतील विशेष शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे गुरुकुलप्रमुख श्री. किरण शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता खाऊवाटपाने करण्यात आली.




पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये पोलीस खाते व विद्यार्थी समुदेशन व्हावे यासाठी पारनेर चे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर साहेब यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी स्वभाविक जीवना मध्ये कशा प्रकारे यश प्राप्त करावे या विषयी सांगितले. खेडकर साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून सावध राहावे मोबाईलचा अतिवापर टाळावा तसेच मेसेज फॉरवर्ड करताना विचारपूर्वक करावे . येत्या आगामी काळामध्ये तुम्ही विद्यार्थी देशाचे भविष्य असून तुमच्याकडून खूप आशा आहेत.यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी सर यांच्या हस्ते पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांचा सत्कार करण्यात आला.

# इंजि. हरिभाऊ गीते यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप



इगतपुरी : (समर्थ गांवकरी)

नाशिक विभागाचे प्रादेशिक जलसंधारण अधिकारी इंजि. हरिभाऊ गिते यांनी कोरोना काळात स्वतः लक्ष घालून धामडकीवाडीतील कुटुंबांपर्यंत आवश्यक मदत पोहोचवली. वाडीवरील लोकांमध्ये असलेले त्यांचे प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा आजही अविस्मरणीय आहे असा सूर इगतपुरी तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी धामडकीवाडी येथे उमटला. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इंजि. हरिभाऊ गीते यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. पत्रकार भास्कर सोनवणे यांनी ह्या उपक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य गोकुळ आगिवले म्हणाले की, आमच्या ग्रामस्थांच्या मनात हरिभाऊ गीते यांच्याविषयी विशेष जिव्हाळा आहे. शालेय साहित्य व खाऊचे वाटपाने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे क्षण फुलले. वाढदिवसाच्या शुभेच्छांचा वर्षाव करत विद्यार्थी व ग्रामस्थांनी हरिभाऊ गीते यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक आदर्श शिक्षक प्रमोद परदेशी यांनी तर सूत्रसंचालन दत्तू निसरड यांनी केले. ग्रामसेवक रुपाली जाधव, वंदना भगत, चांगुणा आगिवले, बबन आगिवले, लहानू आगिवले, खेमचंद आगिवले यांसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुर्गम भागात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या अशा उपक्रमामुळे शैक्षणिक, सामाजिक भान वृद्धिंगत होत असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

# दिव्यांगाना सन्मानाने जगण्याची हमी देणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी : आ. काशिनाथ दाते

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त साहित्य वितरण कार्यक्रम पारनेर येथे संपन्न

पारनेर : (समर्थ गांवकरी)

बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ "देश-विदेशात अनेक दिव्यांग व्यक्तींनी त्यांच्या दिव्य शक्तीने मोठी कार्ये साध्य केली आहेत. आपल्या तालुक्यातील दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांचे जीवन सुलभ व स्वावलंबी करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न मी सातत्याने करत आलो असून संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान जे दीड हजार रुपयांवरून अडीच हजार रुपये करण्यात आले याबाबतचा प्रश्न प्रथमत: मीच विधानसभेत मांडला. तालुक्यातील प्रत्येक दिव्यांगाची साथ, सुविधा व सन्मानाने जगण्याची हमी देणे हीच एक लोकप्रतिनिधी म्हणुन माझी जबाबदारी असल्याचे प्रतिपादन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी आज केले. जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून पारनेर पंचायत समितीच्यावतीने समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्य व साहाय्यक साधनांचा वाटप सोहळा आमदार दाते यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते व्हीलचेअर, सी.पी. चेअर, रोलेटर वॉकर तसेच गृहमार्गदर्शन अध्ययन-अध्यापन साहित्य संच आदी साहित्याचे तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी वाटप करण्यात आले, त्यावेळी उपस्थित दिव्यांग बांधवांशी संवाद साधताना ते बोलत होते.




पुढे बोलताना आमदार दाते म्हणाले की, जिल्हा परिषदेत कार्यरत असताना अपघात मदत योजना, सायकल वितरण, रोजगार सानुग्रह अनुदान, साहित्य साधनांची मदत अशा अनेक योजनांतून दिव्यांग सेवेला नेहमीच प्राधान्य दिले असून हे कार्य पुढेही अधिक सक्षमपणे सुरू राहील. दिव्यांग कायदा अधिनियम २०१६ व २०१७ च्या माध्यमातून शासन स्तरावर दिव्यांगांसाठी अनेक सुधारणा व उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे.

# ...पण पारनेरकरांना वास्तवही समजायला हवं : नगरसेवक युवराज पठारे

पारनेर : (समर्थ गांवकरी)



काल तालुक्यातील विविध सोशल मिडीया माध्यमांवर पारनेर शहराचा विकास आराखडा मंजूर झाल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या, त्या का झाल्या.., कशा झाल्या... त्याची कारण, राजकीय समीकरण भाग वेगळा. परंतु सबंधित विकास आराखडा मंजुरीसाठी फक्त आणि फक्त ठराविक व्यक्तीनीच प्रयत्न केला. ठराविक व्यक्तीनीच सबंधित आराखड्याच्या मंजुरीसाठी जीवाच्या आकांताने प्रयत्न केले हे भासवणे किंवा जाणीवपूर्वक तशा पद्धतीचा आभास निर्माण करणे, ज्यांनी विकास आराखडा मंजुरीसाठी खरेच प्रयत्न केले, त्यासाठी खस्ता खाल्ल्या, जे हे सगळ पुराव्यानिशी सिद्ध करु शकतात, त्यांचे कर्तुत्व डावलण्याचा वा लपविण्याचा राजकीय आकसापोटी प्रयत्न करणे ही स्वतःला तालुक्यातील जनतेचे छोटे-मोठे नेते म्हणून घेणाऱ्या नेत्यांनी जनतेची केलेली फसवणूक नाही काय..? असा सवाल पारनेर शहराचे नगरसेवक पैलवान युवराज पठारे यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना नगरसेवक पठारे यांनी सांगितले की, सबंधित आराखड्याच्या मंजुरीसाठी मी स्वतः समविचारी नगरसेवकांना विचारात घेवून आमदार काशिनाथ दाते सर, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे यांच्या समवेत पुणे येथिल नगर रचना विभागाच्या कार्यालयापासून तर अगदी नगर विकास विभागाचे अवर सचिव सुधीर शास्री यांच्या डेक्सला सबंधित विकास आराखड्याची फाईल पोहचवण्यापर्यंत पाठपुरावा केलेला आहे. आमच्या अपरोक्ष कुणी काय केले..? कुणी प्रयत्न केले त्यांचे कर्तुत्व डावलण्याचा आमचा अजिबात प्रयत्न नाही व नसेलही फक्त "आमच्यासारखे आम्हीच..!" असा ढोल बडविणाऱ्या प्रवृत्तींना आमचा विरोध आहे.

> "पारनेर शहराचा विकास हा अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा आणि लोकप्रतिनिधींच्या प्रामाणिक प्रयत्नांचा परिणाम आहे. पण नुकतेच प्रवेश करून अद्याप स्वागताचा मांडवही न सोडलेल्या काही जणांकडून 'दिड दिसात कोल्हे उसात..!' अशी श्रेय लाटण्याची केविलवाणी धडपड सुरू आहे, हे अत्यंत हास्यास्पद व अगदी त्यांच्या स्वतःच्या मनालाही न पटणारे आहे. विकासासाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्यांची ओळख जनतेला चांगली आहे, आणि सोशल मीडिया पोस्टने श्रेय मिळत नसते हे समजून घेणे आवश्यक आहे. श्रेयवाद नव्हे, तर विकासवाद हाच पारनेर तालुक्याच्या आमदार दाते सरांच्या माध्यमातून सुरु असलेल्या विकासाचा राजमार्ग आहे."

पहिले गॅझेट नोटिफिकेशन कधी झाले, कुणाच्या मार्गदर्शनाखाली कुणी ठराव केला, किती सदस्यीय समिती तयार झाली, कुणाच्या समावेशाने झाली, सबंधित विकास आराखडा सहायक नगर रचना सचिव यांच्याकडे कधी सादर करण्यात आला याविषयी आमचे काहीही म्हणणे नाही परंतु दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी नगर विकास विभागाचे अवर सचिव धैर्यशील पाटील यांच्याकडून नगर विकास विभागाच्या सहसचिव सुलेखा वैजापुरकर यांच्याकडे त्यानंतर दुसऱ्या दिवशी अप्पर मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्याकडे तर ८ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे साहेबांकडे व त्यानंतर उपमुख्यमंत्र्यांचे सहसचिव व्यंकटेश भट आणि शेवटी म्हणजे ९ सप्टेंबर रोजी अवर सचिव सुधीर शास्री यांच्याकडे सबंधित विकास आराखडा पोहचविण्यासाठी आम्ही स्वतः पाठपुरावा केलेला असून त्याचवेळी महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांना सबंधित आराखडा मंजूर करण्याची मागणी व आवश्यकता लक्षात घेवून मंजुरी देण्याविषयी बोलणी केलेली होती.